cmyk

## संपादकीय

### इंडी आघाडी चेहऱ्यात अडकतेय

महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांना २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळाल्यावर आणि प्रत्येक पक्षाला मिळालेले संख्याबळ लक्षात घेतल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी संधान बांधले आणि अनोखा प्रयोग केला. खरंतर तो जनमताचा अनादर आणि सत्तेसाठीची कोलांटी होती. पण अनोखा प्रयोग असे त्याला संबोधले गेले. शरद पवारांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आणले आणि भाजपला विरोधी बाकावर बसवले.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### वन नेशन वन इलेक्शन विधेयकाला केंद्राची मंजुरी

नवी दिल्ली: केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरूवारी (दि.१२) वन नेशन वन इलेक्शन या विधेयकाला मंजुरी दिली आहे. भाजपच्या जाहीरनाम्यातील प्रमुख आश्वासनांपैकी 'एक देश, एक निवडणूक' हे एक होते. वन नेशन वन इलेक्शन विधेयकासाठी (एक राष्ट्र एक निवडणूक) माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्त्वाखाली २ सप्टेंबर २०२३ रोजी समितीची स्थापना झाली होती. या समितीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्य सभेतील माजी विरोधी पक्षनेते गुलाम नबी आझाद, माजी वित्त आयोगाचे अध्यक्ष एनके सिंग, माजी लोकसभेचे महासचिव सुभाष कश्यप आणि ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांचा समावेश होता. समितीने १८,६२६ पृष्ठांचा अहवाल सादर केला होता.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२३० | शुक्रवार, दि.१३ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# शक्तिपीठ महामार्ग निर्णय तत्काळ रद्द करा !

## मराठवाड्यातील शेतकरी आंदोलन करण्याच्या तयारीत; लातूर, नांदेड, परभणी, बीड आणि हिंगोली जिल्ह्यातून जातो शक्तिपीठ

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**राज्यातील नव्या सरकारने शक्तिपीठ महामार्ग निर्मितीचा निर्णय तत्काळ रद्द करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मराठवाडा शक्तिपीठ महामार्गविरोधी कृती समितीने दिला आहे.**

महायुती सरकारचा शपथविधी सोहळा पार पडताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्ग करणार अशी घोषणा केली. त्यांनी फक्त कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांचा विरोध आहे, असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती खूप वेगळी असल्याचा दावा समितीने केला आहे. निवडणुकीच्या अगोदर महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील काही जिल्ह्यांचा दौरा केला असता त्या त्या ठिकाणी शक्तिपीठ महामार्गाला विरोध असल्याची निवेदने, निदर्शने शेतकऱ्यांकडून करण्यात आली होती. विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शक्तिपीठ महामार्ग रद्द करणार अशी घोषणा देखील तत्कालीन मुख्यमंत्री शिंदे यांनी केली होती. पावसाळी अधिवेशनामध्ये सार्वजनिक बांधकाममंत्री दादा भुसे यांनी शेतकऱ्यांसोबत चर्चा करून पुढील वाटचाल करू, असे आश्वासित केले होते. परंतु अद्याप कुठलीही बैठक लावली गेली नाही, त्यामुळे शेतकरी वर्गात नाराजी आहे. महामार्गाच्या ७ मार्च २०२४ च्या अधिसूचनेला आव्हान देणारे आक्षेप शेतकरी आणि नागरिकांनी नोंदवले आहेत. याची दखल मुख्यमंत्री फडणवीस यांनी घ्यावी, अन्यथा ◀◀ पान २ वर




### मराठवाड्यातील बागायतीचे नुकसान

मराठवाड्यामध्ये शेतकरी नाराज असण्याचे प्रमुख कारण म्हणजे मोठ्या प्रमाणात बागायती जमिनीचे नुकसान होणार आहे. सध्या मराठवाड्यात ज्या पट्ट्यातून महामार्ग जातोय त्या पट्ट्यात बागायती शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. ऊस, केळी, हळद, भुईमूग, फळबागा, द्राक्ष इ. बागायती पिके घेतली जातात. तसेच या पट्ट्यात सुपीक माती आणि पाण्याची उपलब्धता असल्याने झाडांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.



### अमित शहा यांनी घेतली शरद पवारांची भेट

नवी दिल्ली: राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा गुरूवारी (दि.१२) ८५ वा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील शरद पवारांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अमित शाह ६ जनपथ निवासस्थानी दाखल झाले. खासदार सुप्रिया सुळे यांनी अमित शाह यांचे स्वागत केले. काहीच मिनिटांत अमित शाह आणि शरद पवार यांची भेट झाली. अमित शाह यांनी पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचा सत्कार केला, तसेच निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा ◀◀ पान २ वर

## सामाजिक संघटनांचे आवाहन, संतोष देशमुख हत्याप्रकरणातील मुख्य सूत्रधाराला अटक करण्याची मागणी

# आज बीड जिल्हा बंदची हाक!

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्याच्या मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणात आज दि.१३ रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. सोशल माध्यमावर याबाबतचे जाहीर आवाहन संघटनांकडून करण्यात आले आहे. मसाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत तीन आरोपींना अटक केली आहे. परंतु या घटनेतील मुख्य सूत्रधाराला अटक करून कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी जिल्ह्यातील संघटनांकडून केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर बीड जिल्हा बंद पुकारला आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन तपास**

### हत्या प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवा - धनंजय मुंडे

**परळी वै. : मस्साजोग येथील सामाजिक कार्यकर्ते स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण अत्यंत दुर्दैवी व गंभीर स्वरूपाचे आहे. या स्वरूपाची गुन्हेगारी हे समाज विघातक असून अशा वृत्तीला वेळीच ठेचले गेले पाहिजे, यासाठी या प्रकरणातील सर्वच्या सर्व आरोपींना कठोर शासन केले जावे असे मत धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.**

आज लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्यात आले होते, त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना याविषयी आपले मत व्यक्त केले. अशा ◀◀ पान २ वर



**सीबीआयकडे देण्याची मागणी केली आहे.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन खून करण्यात आला. या प्रकरणात विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले आरोपींमध्ये आहेत. पवनचक्की ◀◀ पान २ वर

### बंद पाळण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

बीडः केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून निघृण हत्या केल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि.१३) रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदमध्ये सहभागी होऊन व्यापारी, नागरिकांनी झालेल्या घटनेचा व जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीचा निषेध व्यक्त करावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



सोमवारी (दि.९) रोजी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच पती सामाजिक कार्यकर्ते स्व.संतोष देशमुख यांचे भरदुपारी अपहरण करण्यात आले आणि ३ तासांनंतर त्यांचा मृतदेह सापडला. अतिशय निघृणपणे त्यांची हत्या करण्यात आली आहे. अपहरण आणि खून यांसारखे गंभीर प्रकरण असताना प्रशासनाने या प्रकरणात योग्य भूमिका घेतली नाही. मारेकर्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न ◀◀ पान २ वर

### गुन्ह्यातील मास्टरमाइंड शोधा - आ. सुरेश धस

सरपंच संतोष देशमुख यांचा खून कणाऱ्या गुन्हेगारांच्या पाठीमागे जे कोणी अका असतील त्यांना शोधून काढा असे आ.सुरेश धस यांनी म्हटले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी भाजपाचे आमदार सुरेश धस हे गुरूवारी मस्साजोग येथे आले असता त्यांनी आपले मत परखडपणे मांडले. याबाबत आपण लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून या प्रकरणाची निपक्षपातीपणे चौकशी करण्याची मागणी करणार असल्याचे म्हटले. यामध्ये जे कोणी पोलीस दोषी असतील त्यांच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहिजे अशी मागणी यावेळी सुरेश धस यांनी केली आहे. ◀◀ पान २ वर



# बीड जिल्ह्यात सोयाबीन खरेदीची मर्यादा वाढली

## धनंजय मुंडेंच्या मागणीला मोठे यश

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून, धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश आले आहे. बीड व लातूर जिल्ह्यात सोयाबीन खरेदी करण्यासाठी हमी भाव खरेदी केंद्रांना प्रति हेक्टरी उत्पादकतेची जी मर्यादा देण्यात आली होती, त्यात दुप्पटीपेक्षा अधिक वाढ करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्रांवर आता प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल ऐवजी २१.५१ क्विंटल इतकी वाढ करण्यात आली असून लातूर जिल्ह्यात देखील प्रति हेक्टरी १२.३० क्विंटल वरून ही मर्यादा वाढवून १९.९९ क्विंटल करण्यात येत असल्याचा निर्णय सहकार व पणन विभागाने घेतला आहे. राज्याचे कृषिमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी यावर्षी हमीभावाने अधिकृत खरेदी केंद्रांच्या मार्फत शेतकऱ्यांची सोयाबीन किमान हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र सोयाबीन खरेदीसाठी प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल इतकी मर्यादा पणन विभागाने निश्चित केली होती. ◀◀ पान २ वर

# पवार साहेबांच्या वाढदिवसानिमीत्त बीडमध्ये कार्यक्रम

## उत्कृष्ट विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिलांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, देशाचे नेते पद्मविभूषण खा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उत्कृष्ट विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व विशेष कार्य केलेल्या महिला यांचा सन्मान करण्यात आला.**

गुरुवारी (दि.१२) रोजी खा.शरदचंद्र पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरच्चंद्र पवार यांच्या वतीने बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात उत्कृष्ट विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि विशेष कार्य केलेल्या महिला यांचा सत्कार करून ◀◀ पान २ वर



# मंत्रिमंडळ विस्तार अंतिम टप्प्यात !

## अजित पवारांनी घेतली अमित शहांची भेट



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुंरूवारी (दि.१२) सकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. संसद भवनातील शहा यांच्या कार्यालयात ही बैठक झाली. शनिवार, १४ डिसेंबर रोजी महाराष्ट्रात नवीन मंत्रिमंडळ सदस्यांचा शपथविधी कार्यक्रम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बुधवारी सायंकाळी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी मंत्रिमंडळ विभाजनाबाबत प्रदीर्घ चर्चा केली. यावेळी भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डाही उपस्थित होते. वेगाने सुरू असलेल्या घडामोडी पाहता मंत्रिमंडळ विस्तार आता अंतिम टप्प्यात आला असल्याचे दिसत आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. सत्तावाटपाचा ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ०.५० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड: १८.०० क्विंटल | १,९८१ | २,४०० | २,१५० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ८.०० क्विंटल | ५,००० | ६,८०१ | ६,१३७ |
| उडीद : ४.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| बाजरी: २१.०० क्विंटल | २,०४१ | ४,३३० | ३,५११ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| सोयाबीन: ३७.५० क्विंटल | ३,९६६ | ४,०२० | ३,९९१ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |

# भारताचा डी गुकेश बुद्धिबळात अजिंक्य!

## जगजेत्तापदाला घातली गवसणी, चिनच्या डिंग लिरेनचा केला पराभव

**पुणे । प्रतिनिधी**

जगभरातील बुद्धिबळ प्रेमींचे लक्ष वेधलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा आव्हानवीर दोम्माराजू गुकेशने गुरूवारी (दि.१२) इतिहास रचला. वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी त्याने जगज्जेता डिंग लिरेन याचा पराभव करत जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपदाला गवसणी घातली. या विजयासह त्याने विश्वनाथन आनंदच्या एलिट ◀◀ पान २ वर



# लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथगडावर राज्यभरातून मोठी गर्दी !

## मुंडे साहेबांचे संस्कार व विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही-आ.पंकजाताई मुंडे

**परळी वै. । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी आपलं अखंड आयुष्य कमळ रुजविण्यात घातलं आणि शेवटी कमळातच त्यांनी विसावा घेतला. वंचित, उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देत असताना ज्यांचा कोणी वाली नाही त्यांचा कैवारी होण्याचे काम मुंडे साहेबांनी केलं. धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी सर्वंकष राजकारण केलं, हाच संस्कार व विचार घेऊन आपण वाटचाल करत आहोत. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत मुंडे साहेबांचे संस्कार व विचार मी संपू देणार नाही असा निर्धार भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी आज गोपीनाथ गडावर बोलताना व्यक्त केला.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त गोपीनाथ गडावर आज राज्यभरातून मुंडे प्रेमींनी सकाळपासूनच दर्शनाला गर्दी केली होती. यावर्षीचा समारंभ साधेपणाने साजरा करणार असल्याचे आमदार पंकजाताई मुंडे यांनी जाहीर केले होते तथापि, गोपीनाथ गडावर लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी ◀◀ पान २ वर



### गुन्हेगार तो गुन्हेगारच: कोणाच्या जीवावर उठण्याएवढा असूरीपणा असू नये

बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीवर पंकजाताई मुंडे यांनी चिंता व्यक्त केली.केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्या अतिशय दुर्दैवी व संतापजनक घटना आहे.या कुटुंबीयांच्या दु:खात मी सहभागी आहे. याबाबत मी मुख्यमंत्र्यासह संबंधितांना बोलले आहे. त्याचबरोबर परळीतील अमोल विकासराव डुबे यांचे अपहरण करून लूटमार करण्यात आली.या दोन्ही घटनेतील दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे .या घटनांबद्दल मी प्रचंड संताप व्यक्त करते.बीड जिल्ह्यात अशी गुन्हेगारी चालू देणार नाही. गुन्हेगारी रोखण्याचा प्रयत्न हवा पण जिल्ह्याची बदनामी करु नका.दु:खद घटनांकडे दु:ख म्हणून बघा यात राजकारण नको असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. दरम्यान, मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी संध्याकाळपर्यंत रांग लागली होती. यावेळी आयोजित महाप्रसादाचा हजारो लोकांनी लाभ घेतला.

cmyk

अग्रलेख

# इंडी आघाडी चेहऱ्यात अडकतेय

महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांना २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळाल्यावर आणि प्रत्येक पक्षाला मिळालेले संख्याबळ लक्षात घेतल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी संधान बांधले आणि अनोखा प्रयोग केला. खरंतर तो जनमताचा अनादर आणि सत्तेसाठीची कोलांटी होती. पण अनोखा प्रयोग असे त्याला संबोधले गेले. शरद पवारांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आणले आणि भाजपला विरोधी बाकावर बसवले. शरद पवार यांचा हा सत्तेचा प्रयोग खुपच गाजला आणि नरेंद्र मोदी, भाजप यांना रोखण्यासाठी पवार यांची कसरत भाजप विरोधकात चर्चेचा विषय बनली आणि त्यातून पुढे इंडी आघाडीचा जन्म झाला.

भाजपला रोखण्यासाठी सारे भाजप विरोधक स्वतंत्र अस्तित्व ठेवून एकत्र झाले. त्यांचे संघटन झाले व इंडीचे नेतृत्व काँग्रेसकडे, राहुल गांधींकडे सोपवण्यात आले. इंडीच्या चार दोन बैठका झाल्या. कर्नाटकात भाजपला पराभव पत्करावा लागला. त्यामुळे इंडी आघाडीची मात्रा योग्य झाली अशी खात्री झाली आणि लोकसभा निवडणुकीत इंडीने जोर पकडला. राहुल गांधींनी भारत जोडो पदयात्रा काढली. शरद पवार, मल्लिकार्जुन खर्गे, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, नितीश कुमार, उद्धव ठाकरे वगैरे वगैरे सारे एकत्र आले. संविधान आणि राखीव जागा यावरुन रान पेटवले गेले. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे, संजय राऊत, शरद पवार रोज भाजपाला आणि मोदी-शहांना टीकेचे लक्ष बनवू लागले. त्याचा परिणाम लोकसभेत विरोधकांना सत्ता नाही पण नेतेपद मिळेल इतके यश आले. राहुल गांधी विरोधी पक्ष नेते झाले. पण मध्यंतरीच्या काळात जनादेश डावलणाऱ्या शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडली. महाराष्ट्रातील सत्ता गेली व आता २०२४ च्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी मतदारांनी लाथाडली. आता पाच वर्षं ना केंद्रात सत्ता, ना राज्यात सत्ता, जोडीला अनेक भानगडी, प्रकरणे चव्हाट्यावर येऊन चौकशी कारवाईचा बडगा त्यामुळे इंडी आघाडीत घालमेल सुरु झाली.

आता इंडी आघाडीचा चेहरा कोण असावा यावरुन वाद सुरु झाला आहे. देशात राजकारण म्हणजे सत्तेचेच असा एक नवा प्रवाह रुढ होताना दिसतो आहे. त्यामुळे इंडी आघाडीत नेते पदावरुन दोन तट पडताना दिसत आहेत. इंडी आघाडी नेतृत्व राहुल गांधींकडून ममता बॅनर्जी यांच्याकडे सोपवावे अशी मागणी व तशा हालचाली आता सुरु झाल्या आहेत. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. तेथे विरोधक केवळ दंगा करुन, घोषणा देऊन कोणतेच कामकाज होऊ देताना दिसत नाहीत तर राज्यसभेत सभापती धनकड यांच्यावर अविश्वास ठराव आणला गेला आहे. तो मंजूर होतो नाही हे कळेलच. पण संसदेत विरोधी नेता म्हणून राहुल गांधी कमी पडत आहेत अशी टीका सुरु झाली आहे. त्यावरून इंडी आघाडीत दोन तट पडले आहेत शरद पवार, लालू यादव यांनी इंडीचे नेतेपद पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचेकडे सोपवावे असे म्हटले आहे तर उद्धव ठाकरे, वर्षा गायकवाड वगैरे नेते इंडीचे नेतृत्व राहुल गांधींकडेच हवे असे सांगू लागले आहेत. थोडक्यात सत्तेसाठी एकत्र आलेले विरोधक सत्ता मिळाली नाही सत्ता मिळणार नाही म्हणून बिथरले आहेत. यामध्ये आतले राजकारण उद्योगपती अदानी यांच्याशी संबंधित आहे. राहुल गांधींची गाडी अदानी या विषयावर थटली आहे. ती पुढे सरकायला तयार नाही आणि अदानी हे शरद पवार, ममता बॅनर्जी यांनाही जवळचे आहेत. देशाचे सर्वोच्च सभागृह लोकसभा, संसद ही जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी, संवादासाठी वापरले पाहिजे पण बहिष्कार, घोषणाबाजी आणि हेवे दावे, आरोपप्रत्यारोप यामुळे कामकाज होत नाही. राहुल गांधींची प्रभावी विरोधीपक्ष नेता उत्तम संसदपटू आणि सर्व विरोधकांची वज्रमूठ बांधणारा नेता अशी प्रतिमा अपेक्षित आहे पण तसे होत नसल्याने इंडी आघाडीत नेते पदावरुन घालमेल सुरु झाली आहे. उद्धव ठाकरे यांना पुन्हा आपले हिंदू कार्ड आठवू लागले आहे. तथापि इंडी आघाडीसाठी त्यांना राहुल गांधी हवे आहेत, उद्धव ठाकरे यांनी पुन्हा पूर्ववत हिंदू हिंदू नामजप सुरु केल्याने त्यांची नवी मतदार पेटी विस्कटू लागली आहे. दोन्ही घरचा पाहुणा उपाशी अशी वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून ते प्रयत्नशील आहेत. पण देशात इंडी आघाडी आणि महाराष्ट्रात विकास आघाडी अडचणीत दिसते आहे.

# मस्साजोग खून प्रकरणी निष्पक्षपाती चौकशी करा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची मागणी; मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणात निष्पक्षपाती चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांनी गुरुवारी (दि.१२) मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली आहे.**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाचे मूळ कारण पवनचक्की ठरली. याप्रकरणात कुणीही राजकारण करू नये. आरोपींवर कडक कारवाई करावी. या प्रकरणाची निष्पक्षपाती चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच, मागील काही दिवसांपासून बीड मतदारसंघात पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे, यात स्थानिक आमदारांचे आर्थिक हितसंबंध देखील आहेत. त्यांच्या वरदहस्तामुळे अनेक शेतकऱ्यांना त्रास होत आहे. याबाबत आपण अनेकदा आवाज उठविलेला असून बीडच्या आमदारांसह पवनचक्की कंपनीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची कसून चौकशी करण्याची गरज आहे, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.



# सकळ मराठा समाजाच्या वतीने आज बंदची हाक

आष्टी । प्रतिनिधी

आपल्या गावात विकास करणारे, कामांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीला अनेक पुरस्कार मिळवून देणारे आणि सर्वच जाती धर्माच्या गोरगरीबांच्या मदतीसाठी धावून जाणारे मस्साजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांनी निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेचा निषेध आणि या प्रकरणाचा पूर्ण छडा लावून मुख्य आरोपींना अटक करण्यासाठी शुक्रवारी दि. १३ सकल मराठा समाजाच्या वतीने जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे.

सर्व खासगी आस्थापना, व्यावसायिकांनी बंदला सहकार्य करावे असे आवाहन देखील करण्यात आले आहे. संतोष देशमुख यांनी हत्या पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासणारी आहे. संतांच्या जिल्ह्यात अशा गुंडगिरीला प्रोत्साहन देण्याची मानसिकता वाढली आहे. यातूनच जिल्ह्यात अशा घटना घडत आहेत. सोमवारी दि ९ संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांचा खून करण्यात आला. अतिशय क्रूरपणे आरोपींनी हे कृत्य केले आहे. पोलीस प्रशासनाने देखील आरोपींना पाठबळ दिले. या घटनेपूर्वी यातील आरोपींवर किरकोळ कलम लावले. वास्तविक त्या घटनेत अट्रोसिटी व जीवे मारण्याच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंद व्हायला हवा होता. मात्र केज पोलिसांनी किरकोळ कलम लावल्याने आरोपींना तात्काळ जमीन झाला आणि मग आरोपींनी हे घृणास्पद कृत्य केले. या प्रकरणातील आरोपींना राजकीय पाठबळ देखील आहे. त्याचाही शोध पोलिसांनी घ्यावा. घटना घडून तीन दिवस लोटले तरी पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली नाही तसेच या घटनेमागील मुख्य सूत्रधार शोधले नाही. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सकल मराठा समाजाने जिल्हा बंदची हाक दिली आहे. सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले

# जास्तित जास्त विकास कामे करणारी पंचायत समिती म्हणुन गेवराई पं.स.ची ओळख व्हावी-आ. विजयसिंह पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

**विधानसभेची निवडणुक संपली, राजकारण संपले आता विकास कामात राजकारण नको. सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणुक नको, गरजवंत लोकांची कामे निट करा, प्रशासक काळातील मअधिकारी राजफ मधील अनागोंदी आता संपली पाहिजे. प्रलंबित कामे तात्काळ पुर्ण करा अशा सुचना आ. विजयसिंह पंडित यांनी करुन जास्तित जास्त विकासकामे करणारी पंचायत समिती म्हणुन गेवराई पंचायत समितीची ओळख व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. गेवराई पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासह तहसिलदार, गटविकास अधिकारी, कर्मचारी, सरपंच, उपसरपंच व इतर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी मांडलेल्या तक्रारींचे त्याच ठिकाणी निराकरण केल्यामुळे आ. विजयसिंह पंडित यांच्या भुमिकेचे तालुक्यातील सरपंच व इतरांनी स्वागत केले.**



गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी गुरुवार दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात गेवराई पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी व्यासपिठावर आ. विजयसिंह पंडित, जयभवानी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, तहसिलदार संदिप खोमने, गटविकास अधिकारी श्रीमती मिना कांबळे, नरेगाचे गटविकास अधिकारी अशोक राठोड, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, दैठणचे सरपंच प्रतापसिंह पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. बैठकीला गेवराई तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक यांच्यासह पंचायत समितीचे सर्व विभाग प्रमुख आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत मग्रारोहयो योजनेसह पंचायत समितीच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. काही सरपंचांनी बैठकीत केलेल्या तक्रारींचे निराकरण जागेवरच केल्यामुळे आ. विजयसिंह पंडित यांच्या भुमिकेचे सर्वत्र स्वागत करण्यात आले. यावेळी बोलतांना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, येणारा काळ वादादित करण्यापेक्षा सार्वाधिक विकास कामे करणारा असावा यासाठी आपण सर्वजन समन्वयाने प्रयत्न करु. सामान्य लोकांसाठी अधिकारी व कर्मचारी यांनी पुर्ण वेळ कार्यालयात उपस्थित रहाणे आवश्यक आहे. आजवर लागलेल्या चुकीच्या पद्धती बंद करा, तक्रारीसाठी कागद काळे करण्याची वेळी आमच्यावर आणू नका असा इशारा देवुन त्यांनी दर सोमवारी आपण पंचायत समिती येथे जनतेच्या कामासाठी उपलब्ध असणार असल्याचे सांगितले. त्यांनी मुद्देनिहाय कामकाजा बाबत अभ्यासपुर्ण मार्गदर्शन केले. आ. विजयसिंह पंडित यांनी बैठकीची सुरुवात करतांना लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन केले. बैठकीत बोलतांना त्यांनी सांगितले की, लोकांची कामे करतांना गट-तट, पक्ष-संघटना पाहू नका, नियमात असेल ते काम प्राधान्याने करा, कोणाचीही आडवणुक करु नका प्रत्येक लाभार्थ्याला न्याय मिळाला पाहिजे. गायगोठे, घरकुल, विहीरी, रेशीम आणि मोहगणीची लागवड अशा वैयक्तीक लाभांच्या योजनेतील लाभार्थ्यांची आर्थीक पिळवणुक खपवुन घेणार नाही हे सांगतांना प्रलंबित कामे पुर्ण झाल्याशिवाय नविन कामे मंजुर करु नयेत अशी सुचना त्यांनी यावेळी केली. मधल्या काळात लोकप्रतिनिधींचे पंचायत समितीकडे दुर्लक्ष झाले असेल मात्र मी स्वत: आता लक्ष घालणार असल्यामुळे कर्तव्यात कसुर करणार्यांची आपण गैय करणार नाहीत असेही त्यांनी सांगितले. पंचायत समितीच्या कामकाजात सुसूत्रता यावी यासाठी आजची बैठक असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

# आनंदी राहण्यासाठी हवे 'डोपामाइन' -डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**तुम्हाला आठवते का की तुम्ही शेवटच्या वेळी आनंदी केव्हा होता? असा एक क्षण ज्यामध्ये तुम्ही मनापासून आनंदी होता, मग ती तुमची वैयक्तिक किंवा व्यावसायिक कामगिरी असो.तो क्षणिक आनंद जो कधी कधी आयुष्यात केवळ एखाद्या खास प्रसंगीच मिळतो, त्यालाच 'डोपामाइन' म्हणतात.**



डोपामाइन हा एक प्रकारचा न्यूरोट्रान्समीटर आहे जो शरीर,मेंदू आणि वर्तन नियंत्रित करतो. डोपामाइन प्रामुख्याने मेंदूच्या पुरस्कार (रिवॉर्ड) आणि आनंद केंद्राशी संबंधित आहे. जेव्हा 'डोपामाइन' सोडले जाते, ज्यामुळे आपल्याला आनंद होतो. झोप आणि पचनासह आपल्या भावनिक आरोग्याचा हा सर्वात महत्वाचा भाग आहे. जेव्हा तुम्हाला आयुष्यात आनंदी वाटेल तेंव्हा त्यामागे डोपामाइन आहे असे खुशाल समजा. डोपामाइन म्हणजे हसणे आणि जीवनात आनंदी क्षण घालवणे याच्याशी संबंधित आहे, परंतु ते योग्य प्रमाणात असले तर शरीरासाठी चांगले असते. त्याचे संतुलन बिघडले तर ते शरीरासाठी हानिकारक ठरु शकते. डोपामाइनवर अद्याप कोणतेही संशोधन झालेले नाही. ते मनोविकार,नैराश्य,झोपेची कमतरता आणि चिंता कमी करते. शिवाय ते व्यक्तीला त्यांच्या दैनंदिन जीवनातील क्रिया करण्यास मदत करते.

**'फील गुड हार्मोन'**

'डोपामाइनला'फील गुड हार्मोन' असेही म्हटले जाते कारण ते एक न्यूरोट्रान्समीटर आहे. जो आपले पुरस्कार, आनंद, विचार, नियोजन, समन्वय, हालचाल आणि संज्ञानात्मक क्षमतांमध्ये महत्वाची भूमिका बजावतो. याचा आपल्या संपूर्ण वर्तनावर खोल परिणाम होतो.''

**डोपामाइनचे फायदे-तोटे**

डोपामाइनचे मानसिक आरोग्याच्या नियमनात,संज्ञानात्मक कार्य,विचार आणि आनंद या सर्वांमध्ये महत्वाची भूमिका बजावते. या सर्व गोष्टीमध्ये डोपामाइनची भूमिका महत्वाची असते. डोमापाइनच्या असंतुलनामुळे अनेक मानसिक विकार होऊ शकतात, ज्यामध्ये स्किझोफ्रेनिया,मनोविकार(अटेंशन डेफिसिट हायपरॲक्टिव्हिटी डिसऑर्डर-एडीएचडी) या सारख्या आजारांचा समावेश होतो. एडीएचडी हा आजार लक्ष,नियंत्रण आणि हालचालीवर परिणाम करतो असे डॉ.जगदीश टेकाळे यांनी सांगितले. जेंव्हा शरीरात डोपामाइची पातळी जास्त असते तेंव्हा त्यामुळे आवेग नियंत्रण,समस्या सोडवण्यात अडचण,घाईघाईने निर्णय घेणे यासारख्या समस्या उध्दवू शकतात.त्याच वेळी,जेंव्हा डोपामाइनची पातळी कमी होते तेंव्हा यामुळे थकवा,आळस आणि आनंद अनुभवण्यास असमर्थता यासारख्या समस्या उद्भवुन शकतात, असेही ते म्हणाले.

**हे करुन तर पहा.**

तुम्हाला डोपामाइनचा फायदा घ्यायचा असेल तर आज पासूनच तुम्हाला आनंद देणाऱ्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला आनंद देणाऱ्या मित्राशी तुम्ही बोलू शकता. लहान मुलांसोबत खेळु शकता,आवडती पुस्तके वाचु शकता या व्यतिरिक्त,तुम्हाला बरे वाटेल अशा कोणत्याही गोष्टीत गुंतणे तुमच्या आरोग्यासाठी खुप महत्वाचे आहे.असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

# पान १ वरून...

## शक्तिपीठ महामार्ग निर्णय

तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कृती समितीचे गजेंद्र येळकर, अनिल ब्याळे, बालाजी इंगळे, बस्वराज झुंजारे, रवी मगर, राजेंद्र पाटील, बबन चौंडे, शेखर ब्याळे, खंडू भिसे, श्रीधर माने, बाळू कराड, देवकते, दुधाने, तात्याराव पवार, श्रीनिवास शेळके, राहुल शिंदे, परमेश्वर मोटे व बाबुलाल शेख यांनी दिला आहे.

-----------

## अमित शहा यांनी घेतली

देऊन अभिष्टचिंतन केले. आज शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार कुटुंबियांसह त्यांना भेटायला गेले होते, त्यामुळे राजकीय वर्तुळात सर्वांनीच भुवया उंचावल्याचे पाहिला मिळाले. तसेच, अजित पवार यांनी शरद पवारांची भेट घेतल्यानंतर अनेक राजकीय तर्कवितर्क लावले जात आहेत. अशातच अमित शाह यांनी शरद पवारांची भेट घेतली. त्यामुळे वाढदिवसाच्या शुभेच्छा की, भेटीमागे काही वेगळे राजकारण आहे? अशा चर्चांनाही सुरुवात झाली आहे.

---------

## बंद पाळण्याचे आ.संदीप

पोलीसांकडून झालेला असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील वातावरण अतिशय दहशतीचे झाले असून यामागे काही विशिष्ट व्यक्तीविशेष आहेत. बीड जिल्ह्यात अक्षरशः बिहार सारखी परिस्थिती होत चालली आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावत चालली आहे. या प्रवृत्तीला आळा घालणे ही बाब अत्यावश्यक झाली आहे. स्व.संतोष देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. ही मागणी घेऊन व झालेल्या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी बीड जिल्ह्यातील व्यापारी व नागरिकांनी आजचा बंद पाळण्याचे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

------------

## आज बीड जिल्हा

कंपनीकडून दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्यावरुन केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे, या दोन्ही घटनांचे कनेक्शन आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, २ कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणात माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक मुंडे यांचेही नाव असून त्यांच्यावरही खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे संतोष देशमुख अपहरण व खून प्रकरणारुन बीडमधील राजकीय व सामाजिक वातावरण तापले असून, विविध संघटनांनी शुक्रवारी बीड बंदची हाक दिली आहे. मुख्य सुत्रधारास अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली असून, यासाठीच बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला आहे.

---------

## हत्या प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात

स्वरूपाची गुन्हेगारी ही घातक असून पुन्हा वेळीच कठोर शासन केले जावे व देशमुख कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवले जावे असेही धनंजय मुंडे म्हणाले.

संतोष देशमुख हत्येच्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक केली जावी तसेच हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवले जावे या संदर्भात धनंजय मुंडे यांनी एक पत्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनाही दिले आहे. गुन्हेगारी ही एक अपप्रवृत्ती आहे, तिला जात नसते, मात्र या प्रकरणाचा अडून काही जण जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करून जातीय तेढ निर्माण करण्याचा तसेच या दुर्दैवी घटनेच्या आडून राजकारण साधण्याचा प्रयत्न करत असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. पवनचक्कीच्या संदर्भातील कामाच्या वादातून ही हत्या झाल्याचे समजते, मात्र जाणीवपूर्वक याआडून बीड जिल्ह्याची बदनामी केली जात आहे. पोलीस यंत्रणा, तपास यंत्रणा तसेच न्यायव्यवस्था या माध्यमातून संतोष देशमुख यांना नक्कीच न्याय मिळेल, कुणीही नाहक जिल्ह्याची बदनामी करू नये, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केले आहे.

---------

## मंत्रिमंडळ विस्तार

फॉर्म्युला निश्चित होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही गुरुवारी सकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. संसद भवनातील अमित शहा यांच्या कार्यालयात ही बैठक झाली. यावेळी राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल उपस्थित होते. दरम्यान, महायुती सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला पुन्हा एकदा अर्थ खात्यासह जुनी खाती घ्यायची असल्याचे मानले जात आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार १४ डिसेंबरला होणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

**भाजप २०, शिवसेना १३, तर राष्ट्रवादीला १०**

१४ डिसेंबर रोजी महाराष्ट्रात नवीन मंत्रिमंडळ सदस्यांचा शपथविधी कार्यक्रम आहे. विधानसभेचे हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. महाराष्ट्रात एकूण २८८ जागा आहेत. सरकारमध्ये एकूण ४३ मंत्र्यांचा समावेश केला जाऊ शकतो. भाजपने २० मंत्रीपदे ठेवण्याची तयारी केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला १३ आणि अजित पवार यांच्या पक्षाला १० मंत्रीपदे मिळतील, असे मानले जात आहे.

**१४ तारिखही निश्चित नाही**

भाजपमधील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले की, १४ तारखेला मंत्रिमंडळ विस्तार होईलच, असे सांगता येत नाही. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तारावरून महायुतीमध्ये दोन पक्षांमध्ये वेगवेगळी मते असल्याचे पाहायला मिळाले. या दोन मतांवरून महायुतीमध्ये मंत्रिमंडळ विस्तारावरून संभ्रम असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार येत्या १४ तारखेला होणार की आणखी पुढे जाणार, हे शनिवारी समजेल.

**नगरविकासही मिळणार नसल्याने एकनाथ शिंदे अस्वस्थ ?**

गृह खात्यासोबतच नगरविकास खातेही एकनाथ शिंदे यांना वा त्यांच्या शिवसेनेला देण्यास भाजपने नकार दिल्याने शिंदे अस्वस्थ असल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय शिवसेनेतील आ.अब्दुल सत्तार यांना मंत्रिमंडळात सामील करून घेण्यास भाजप राजी नाही. डॉ. तानाजी सावंत, माजी मंत्री संजय राठोड यांनाही मंत्रीमंडळात सामील करून घेण्यास भाजपचा विरोध आहे. शिवसेनेने कुणाला मंत्री करावे हे खरे तर एकनाथ शिंदे यांनी ठरविणे अपेक्षित असताना, त्यात भाजप हस्तक्षेप करीत असल्याने शिंदे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

----------

## पवार साहेबांच्या वाढदिवसानिमीत्त

सन्मान करण्यात आला. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.उषाताई दराडे, राजेंद्र मस्के यांच्यासह बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

## बीड जिल्ह्यात सोयाबीन

या मर्यादेमुळे शेतकऱ्यांच्या समोर उर्वरित सोयाबीनचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे या मर्यादेत वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या प्रमाणात सोयाबीन खरेदी केली जावी, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी लावून धरली होती. अखेर मुंडेंच्या या मागणीस यश आले असून आता बीड जिल्ह्यात अधिकृत केंद्रांच्या माध्यमातून नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल ऐवजी २१.५१ क्विंटल पर्यंतची सोयाबीन शेतकऱ्यांना हमीभावाने विकता येणार आहे.

------------

## भारताचा डी गुकेश

क्लबमध्ये प्रवेश केला. विश्वविजेता बनणारा तो भारताचा दुसरा बुद्धिबळपटू आहे. ही कामगिरी करणारा विश्वनाथन आनंद हा पहिला भारतीय खेळाडू आहे. डी गुकेशने १३ गेमनंतर चिनी प्रतिस्पर्धी डिंग लिरेन विरुद्ध ६.५-६.५ अशी बरोबरी साधली. १४ व्या गेममध्ये डिंग लिरेन पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळत होता. अशा स्थितीत त्याचा वरचष्मा मानला जात होता. पण डी गुकेशने सर्व अंदाज धुडकावून लावत रोमहर्षक लढतीत बाजी मारली. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपदाचा सामना बुधवारी १३ वा डाव बरोबरीत सुटला होता. त्यामुळे गुकेश अणि त्याचा प्रतिस्पर्धी जगज्जेता डिंग लिरेन यांचे समान ६.५ गुण झाले होते. अखेरचा पारंपरिक डाव गुरूवारी (दि. १२) खेळला गेला. डिंग हा पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणार असल्याचे त्याचे पारडे जड मानले जात होते. चौदाव्या डावात जो कोणी ७.५ गुणांची कमाई करणारा खेळाडू हा जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद पटकावतो. गुकेशने ११ व्या डावात ६-५ अशी आघाडी घेतली होती. मात्र डिंग लिरेनने १२ व्या डावात बरोबरी साधण्यात यश मिळवले होते. जागतिक लढतीमध्ये १३ डावानंतरही गुणांची बरोबरी कायम राहिली. तेराव्या डावात ६९ चालींच्या प्रदीर्घ लढ्यानंतर दोघांनीही बरोबरी पत्करण्याचा निर्णय घेतला होता. या अजिंक्यपद स्पर्धेत १३ डावांपैकी ३२ वर्षीय डिंगने पहिला डाव जिंकला तर गुकेशने तिसरा डाव जिंकून बरोबरी साधली. दोन्ही ग्रँडमास्टर्सनी सलग सात डाव बरोबरीत सोडवले होते.

---------

## लोकनेत्याच्या अभिवादनासाठी

राज्याच्या कानाकोपऱ्यातून जनसागर उसळला होता. दुपारी हेलीकॉप्टरने आगमन होताच आ. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांनी लोकनेत्याच्या समाधीला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मातोश्री प्रज्ञाताई मुंडे,पंकजाताई मुंडे यांचा मुलगा आर्यमन , माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, आ.मोनिका राजळे, आ. मनोज कायंदे , माजी आ. भीमराव धोंडे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके आदींसह राज्यभरातून आलेले मान्यवर प्रमुख नेते, कार्यकर्ते उपस्थित होते. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त समाधी परिसरात भजनी मंडळाच्या पथकाने उत्कृष्ट भजन सादर केले, यात स्वतः पंकजाताई मुंडे, डॉ. प्रीतमताई मुंडे काही काळ सहभागी झाल्या होत्या.

**आयुष्य जनतेसाठी समर्पित**

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, पालकमंत्री म्हणून पाच वर्ष मी या जिल्ह्याची प्रामाणिक सेवा केली.कधीही जात पात धर्म बघितला नाही.मुंडे साहेबांचे हेच संस्कार आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे हा तुमचा- माझा -आपल्या सर्वांचा स्वाभिमान असून त्यांचे संस्कार व विचार संपू न देणं हे आपलं कर्तव्य आहे. संस्कार, विचार व सर्वांचा विकास या सूत्रावर वाटचाल करताना आपले आयुष्य जनतेसाठी समर्पित आहे.ही वाटचाल करताना आपण कधीही डगमगणार नाही. ''उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही.

**मुंडे साहेबांचे संस्कार व विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही**

गेल्या काही दिवसापासून आपली तब्येत व्यवस्थित नाही आजारी असल्याने व डॉक्टरांनी गर्दीत जाऊ नका असं सांगितल्याने आणि सध्या दौरे व कार्यक्रम बंद आहेत परंतु माझ्यापेक्षाही जास्त तुम्ही मुंडे साहेबांवर प्रेम करतात आणि न चुकता तीन जून व बारा डिसेंबरला गोपीनाथ गडावर येता. माझा तर जन्म मुंडे साहेबांच्या पोटी झाला असल्याने मी येणार नाही असे होऊ शकत नाही मुंडे साहेबांनी दिलेले ते संस्कार आणि त्यांचे विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही.

**वंचित मराठवाड्याला न्याय, सुरक्षित लोकजीवन व सर्वांचा विकास हे सूत्र घेऊन राजकारणात काम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची विकासाकडे वाटचाल सुरू असून महाराष्ट्रातही जनतेने आपल्याला भरभरून आशीर्वाद दिले आहेत राज्यभरात सर्व ठिकाणी मी सहभाग घेतल्या आपल्याला जनतेने सत्ता दिली आहे आपल्या मराठवाड्याला न्याय मिळवून देण्याचं काम करायचं आहे. बीड जिल्ह्याचे सुरक्षित लोकजीवन व सर्वांचा विकास करण्याचा आपला सातत्याने प्रयत्न राहिला आहे आणि या सरकारच्या माध्यमातूनही एक काम करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

----------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. १३ डिसेंबर २०२४



## प्रीतीसुधाजी शैक्षणिक संकुलात गीता पठण

राहता । प्रतिनिधी

अध्यात्मिक क्षेत्रातून आदर्श जीवन मूल्यांचा संदेश देणारा पवित्र ग्रंथ श्रीमद्भगवद्गीता जयंती निमित्त राहता येथील प्रीतीसुधाजी शैक्षणिक संकुलात सुमारे २००० विद्यार्थ्यांनी एकाच वेळेस गीतेतील श्लोकांचे पठण करून गीता जयंती साजरी केली

भगवद्गीता अभ्यासिका गीताप्रिय शलाका गांधी, शंतनू गांधी,प्राचार्य ज्ञानेश डांगे,अध्यक्षा स्नेह लता डांगे, संचालिका पूनम डांगे, कार्याध्यक्ष भगवान डांगे, शोभा डांगे,शिवाजी देवढे, स्वाती धनवटे यांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्यास होती.गीता प्रिय शलाका गांधी(वृषाली सुलाखे) यांच्या सुमधुर वाणीतून बालकांनी साथ संगत देत गीतेतील निवडक श्लोकांचे पठण केले, आपल्या जीवनातील भगवद्गीतेचे महत्व आणि कर्माचा त्याग नाही तर त्याग भावाने कर्म करण्याची प्रेरणा भगवद्गीतेत आहे अशी माहिती सौ. गांधी यांनी अतिशय सुंदर प्रकारे दिली. प्राचार्य ज्ञानेश डांगे म्हणाले, कुरुक्षेत्रावर भगवान श्रीकृष्ण यांनी अर्जुनाला गीता सांगितली. त्यातील श्लोक हे सर्व विश्वातील प्रश्नांची उत्तरे मिळवून देणारी आहेत. संस्थेचे कार्याध्यक्ष भगवान डांगे यांनी आपल्या जीवनातील अनुभव कथन करून स्व. इंद्रभान डांगे तुमच्या आठवणींना उजाळा दिला, या सोहळ्यासाठी प्रीती स्कूलच्या नर्सरीतील बालगोपालांनी राधाकृष्ण व महाभारतातील विविध पात्रांची मनमोहक वेशभूषा परिधान केली होती त्यांना आकर्षक बक्षसे देण्यात आली,सूत्रसंचालन प्रा. सचिन गिते व अशोक गाढवे यांनी केले. हा सोहळा यशस्वीतेसाठी स्कूल मधील शिक्षकांनी मेहनत घेतली.

# आपले हक्क जाणून घेणे हा प्रत्येकाचा अधिकार -न्या.माणिकराव वाघ

## जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त न्यू व्हिजन पब्लिक स्कूल येथे कायदे विषयक शिबिर संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

देशातील प्रत्येक नागरिकास आपले हक्क जाणून घेणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असे मत अंबाजोगाई दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश माणिकराव वाघ यांनी व्यक्त केले आहे. ते जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त अंबाजोगाई शहरातील न्यू व्हिजन पब्लिक स्कुल येथे कायदेविषयक शिबिरात बोलत होते.

तालुका विधी सेवा समिती तसेच वकील संघ अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू व्हिजन पब्लिक स्कूल येथील विद्यार्थ्यांसाठी जागतिक मानवी हक्क दिन त्याचबरोबर शाळा महाविद्यालया करिता पोक्सो कायदा या विषयावर कायदे विषयक शिबिर घेण्यात आले. या शिबिरास अंबाजोगाई दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश माणिक वाघ यांची उपस्थिती होती.त्याबरोबर सदरील शिबिरास श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी, वकील संघाचे अध्यक्ष ऍड.जयंत भारजकर, उपाध्यक्ष ॲड.माणिकराव आदमाने,सचिव ऍड.सचिन शेप, सहसचिव ऍड. शाहजान खान पठाण, ग्रंथपाल ऍड.सुरज शेटे, ऍड.सारंग मुंडे, ऍड.अविनाश धायगुडे यांची उपस्थिती होती.

सदरील शिबिराचे प्रास्ताविक ऍड. माणिक आदमाने यांनी केले. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनीही या शिबिरात आपले मनोगत व्यक्त केले. मोदी लर्निंग सेंटरच्या वतीने संस्थेत नेहमीच विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक , सामाजिक तथा सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे संकेत मोदी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण





विकासासाठी त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगातील सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी बाल झुंबड सारखे उपक्रम गेली अनेक वर्षा पासुन अखंड पणे राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. आजपर्यंत मोदी लर्निंग सेंटरमधून आपले शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी मोठया उच्च पदावर कार्यरत असून त्याचा आपणास अभिमान असल्याचे संकेत मोदी यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. ऍड. सारंग मुंडे यांनी भारताचे संविधान व मानवी हक्क या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुढे बोलताना ऍड. सारंग मुंडे यांनी सांगितले की प्रत्येकाने मानवी हक्क जसा माहिती करून घेतला पाहिजे त्याचप्रमाणे देशाप्रती कर्तव्य जोपासले पाहिजे. म्हणजेच प्रत्येकाने आपापले काम हे प्रामाणिकपणे केले तर एक प्रकारे मानवी हक्काची जोपासनाच होईल अशी भावना ऍड. सारंग मुंडे यांनी व्यक्त केली. तर ऍड. अविनाश धायगुडे यांनी पोक्सो कायद्या विषयक उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना गुड टच व बॅड टच याविषयी मार्गदर्शन केले. शाळेतील विशेषतः विद्यार्थीनिनी याबाबत जागरूक असणे गरजेचे असल्याचे ऍड. अविनाश धायगुडे यांनी सांगितले. गुड टच व बॅड टच याबद्दल जर साशंकता वाटली तर लगेच विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकास याबाबत अवगत करण्याचे ऍड. घायगुडे यांनी स्पष्ट केले. आयोजित या कायदे विषयक शिबिराचा अध्यक्षीय समारोप करताना न्यायमूर्ती माणिकराव वाघ यांनी संविधान,मानवी हक्क याचबरोबर विविध विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. बोलताना त्यांनी आपले हक्क जाणून घेणे हा प्रत्येकाचा अधिकार असल्याचे आवर्जून सांगितले. आपले हक्क जाणून घेतांना आपल्या कर्तव्याची देखील जाण असणे हे ही तेवढेच महत्वाचे असल्याचे न्यायमूर्ती वाघ यांनी याप्रसंगी नमूद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे सर्वश्रेष्ठ असून त्याची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सर्वांसोबत चांगले व स्वच्छ प्रतिमेने रहा व समाजात वावरताना सद्सद्विवेक बुद्धीने वागण्याचा सल्ला याप्रसंगी न्यायमूर्ती माणिकराव वाघ यांनी दिला. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन रवींद्र राजगुरू व विजय रापतवार यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार प्राचार्य रेंजो सर यांनी मानले. या कायदेविषयक शिबिरास न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचे विद्यार्थी तसेच शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



पाटोदा : नगरपंचायत मध्ये लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करताना नगराध्यक्ष राजु भैय्या जाधव,मुख्याधिकारी अभय जोशी, श्री सोमीनाथ कोल्हे,कार्यालयीन अधीक्षक प्रेमकुमार मस्के,नगरसेवक नय्युम पठाण,इंजिनिअर टाळके साहेब,अकाऊंट प्रल्हाद वक्ते, श्री महेश भाकरे, श्रीनिवास राऊत ,श्री काकासाहेब जाधव ,प्रा.लक्ष्मण वाघमारे,पत्रकार गणेश शेवाळे,बाजीराव अडागळे. याप्रसंगी उपस्थित..

# जिल्ह्यात २७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी

बीड । प्रतिनिधी

मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत दि. १६ डिसेंबर २०२४ पासून हिवाळी अधिवेशन सुरु होत आहे.तसेच आगामी कालावधीत दत्त जयंती उत्सव साजरा होणार आहे. महाराष्ट राज्याचे हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने आंदोलने होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष अक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते २७ डिसेंबर २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# सामाजिक कार्यकर्ते दत्ता सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त १५१ जणांचे रक्तदान

**आपल्या सहकाऱ्याला बळ देण्यासाठी युवानेते संकेत मोदी यांनी स्वतः रक्तदान करत इतरांनाही रक्तदान करण्याचे आवाहन केले**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील सामाजिक युवा कार्यकर्ते दत्ता सरवदे यांच्या वाढ दिवसानिमित्त बुधवार (दि ११) रोजी त्यांच्या १५१ सहकाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले . या वेळी राजकिशोर मोदी यांचे सुपुत्र तथा श्री बालाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनी आपल्या मित्ररूपी सहकाऱ्याला बळ देण्यासाठी स्वतः देखील रक्तदान करून एक नवीन उदाहरण घालून दिले व इतरांनाही रक्तदान हे श्रेष्ठदान असल्याचे सांगत रक्तदान करण्याचे अवाहन केले.





संकेत मोदी यांच्या या कार्यासाठी त्यांचे सर्वत्र अभिनंदन होतआहे.

अंबाजोगाई शहरातील स्वा रा ती ग्रामीण रुग्णालयात दररोज दीड ते दोन हजार रुग्ण उपचारासाठी येतात. त्यामुळे रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी रक्ताची मोठया प्रमाणावर कमतरता भासते. त्यामुळे अनेक वेळा रुग्णालय प्रशासनाच्या वतीने रक्तदात्याना रक्तदान करण्याचे आवाहन वेळोवेळी करण्यात येते. अशाच अवाहनाला प्रतिसाद देत दत्ता सरवदे यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान शिबीर आयोजित केले होते.जन्मदिनाच्या निमित्ताने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील शासकीय रक्तपेढी येथे महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरात दत्ता सरवदे यांचे अनेक सहकारी मित्र सहभागी झाले होते .

या शिबिरात दत्ता सरवदे यांचयावर प्रेम करणाऱ्या १५१ युवकांनी उत्स्फूर्त पणे रक्तदान केले. आपल्या जन्मदिनाच्या निमित्ताने दत्ता सरवदे हे प्रतिवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करतात . त्यांच्या या शिबिराला मोठा प्रतिसाद देखील मिळतो आहे. या वर्षी युवानेते संकेत राजकिशोर मोदी यांनी देखील दत्ता सरवदे व आपला मैत्रिपणा व प्रेम जोपासत रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान केले .या रक्तदान शिबिर प्रसंगी अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे, उप अधिष्ठाता डॉ राजेश कचरे , डॉ अरविंद बगाटे उपअधिष्ठाता , डॉ नितीन कांबळे निवासी वैद्यकीय अधिकारी,डॉ विनय नाळपे,डॉ वैभव देशमुख श्रीमती कल्पना कुडमुतकर अधीसेविका यांच्यासोबतच रक्तपेढीतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दत्ता सरवदे यांच्या वाढ दिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात मनोज लखेरा, दिनेश भराडिया, जगन सरवदे, विष्णू सरवदे, प्रमोद शिंदे, विजय रापतवार, दत्ता देवकते, रफिक गवळी, महेश कदम, सचिन जाधव ,शैलेश गोस्वामी, संघपाल इंगळे, विक्रम कुरील, कृष्णा शेंडगे, दुर्गेश परदेशी, अविनाश लोमटे, शरद काळे, सचिन खरटमोल, कृष्णा वाघमारे ,गुरु सरवदे, अरविद कोपले, बाबा साबळे, समाधान बनसोडे, अमन परदेशी, बाबा गायकवाड, दिपक सरवदे, किशोर किरवले ,कुमार इंगळे, निलेश जोगदंड,सचिन देवकर, तसेच अमोल गायसमुद्रे यांच्यासह अनेक जण सहभागी झाले होते. सर्वांच्या वतीने संकेत मोदी यांनी दत्ता सरवदे यांना शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. त्याचबरोबर केक कापून वाढदिवस साजरा करत दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## भारतीय बौद्ध महासभा बीड शहरच्या वतीने भैय्यासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा बीड सामाजिक न्याय भवन या ठिकाणी भैय्यासाहेब आंबेडकर यांची ११२ वी जयंती साजरी करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र यशवंत आंबेडकर म्हणजेच भैय्यासाहेब भीमराव आंबेडकर या नावाने सर्वश्रुत आहेत. भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांच्या परिनिर्वाणानंतर स्वतःला धम्मकार्यासाठी झोकून दिले.भैय्यासाहेब आंबेडकरांनी समाजहितासाठी बिकट परिस्थितीत खचून न जाता, न डगमगता आपले संपुर्ण आयुष्य समाजासाठी वाहिले अशा या सुर्यपुत्राची काल म्हणजेच १२ डिसेंबरला जयंती होती.भैयासाहेबांनी भारतीय बौध्द महासभेची जबाबदारी खांद्यावर घेत.चैत्यभूमी, दीक्षाभूमीचे निर्माण त्यांनी केले.भैय्यासाहेबांनी भारतभूषण प्रिंटिंग प्रेस हा छापखाना सुरू केला. पुढे ह्या प्रेसचे नाव बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस असे झाले. १९४४ पासून बाबासाहेबांच्या जनता, प्रबुध्द भारत या मुखपत्रांचे व्यवस्थापन त्यांनी बघितले.बाबासाहेबांच्या थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स, फेडरेशन व्हर्सेस फ्रीडम, थॉट्स ऑन पाकिस्तान, बुद्ध आणि त्याचा धम्म इत्यादी पुस्तकांचे मुद्रण व प्रकाशन बुधभूषण प्रिंटिंग प्रेसमध्ये झाले.बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून धम्म प्रसाराचे कार्य त्यांनी केले. बाबासाहेबांनंतर बौद्ध दीक्षा घेणाऱ्यांची संख्या वाढण्यामागे भैय्यासाहेबांचे मोठे योगदान आहे. भैय्यासाहेबांनी आंबेडकरी चळवळ गावागावापर्यंत पोहचवली.यावेळी समाजातील उपासक उपासिका यांनी एकत्रित येत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन बीड येथे अभिवादन केले.

क्रमांक २०२३/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-२८५
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारूर
दिनांक ०३/१२/२०२४

**जाहीरनामा**

जन्म-मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत
जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस मौजे, असोला ता.धारूर जि.बीड यांना जाहीर केले जाते की, अर्जदार नामे श्रीम.गंगाबाई भ्र.भगवान बोबडे रा.असोला ता.धारूर जि.बीड यांचे दिर नामे ज्ञानोबा वामन बाबडे यांचा मृत्यू दिनांक १२-१२-१९६४ रोजी मौजे, असोला ता.धारूर जि.बीड येथे झाला असून अर्जदारांनी सदरहू मृत्यूची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहू अर्जदाराचे दिराचे कायदेशीर मृत्यूचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू अर्जदारांचे मृत्यूचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार धारूर**

**नगरपंचायत घनसावंगी जि.जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

जा.क्र.२०२४/नपप/जा.प्र./कावी-२६९७ दिनांक-१२-१२-२०२४

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार : तारामती साहेबराव दशरथ रा.ता.घनसावंगी जि.जालना यांनी नामे साहेबराव बालाभाऊ दशरथ, रा.ता.घनसावंगी जि.जालना मिळकत क्र.६४४ च्या नावे नोंद असून वारसाआधारे नामांतर करणे बाबत आवक क्र.४०७१ दि.११/१२/२०२४ अर्ज सादर केला आहे.

अर्जासोबत ०१ साहेबराव बालाभाऊ दशरथ रा.ता.घनसावंगी जि.जालना यांचे मृत्यूप्रमाणपत्र दि.२७/०४/२०२३ मा.विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) जालना यांचे वारस प्रमाणपत्र क्र.CIVIL M.A.No.113/2023 दि.१७/०२/२०२४ इतर वारस यांचे संमतीपत्र/शपथपत्र क्र.११९५८ दि. २०२४ इत्यादी कागदपत्रे जोडली आहे. ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

चतु:सिमा
पूर्व : भारत थोरात यांचे घर, पश्चिम-मंडाबाई दशरथ यांचे घर
दक्षिण-रस्ता, उत्तर - बोळ रस्ता

वरील चतु:सिमा मधील जागा वारसाआधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही. असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसावंगी**

पान ६ वरून...

### शरदचंद्र पवार यांच्या

केले. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी मुलींची संख्या जास्त असल्याने मोहनराव जगताप यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रकाश उजगरे, शरद यादव, अविनाश गोंडे, सर्जेराव शिंदे, ईश्वर होके, प्रकाश चव्हाण, इमरान भाई, मनोज फरके, गोविंद इतापे, अंकुशराव भोसले, गोविंद शेठ करवा, चांद भाई, अशोक किर्जत, गणेश रांजवण, इमरान खान, राजेभाऊ वापटे यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मराठी पत्रकार परिषदेच्या

वाघमारे , जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केज येथे येऊन मुंडे यांच्या निवासस्थानी जात त्यांचे सांत्वन केले व परिषद कायम त्यांच्या सोबत असल्याचे सांगत मदतीचा धनादेश देखील कुटुंबियांच्या हाती सुपूर्द केला .यावेळी परिषदेचे गौतम बचुटे , सुहास चिद्रवार , विजय आरकडे , आदर्श पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक सोनवणे , दशरथ चवरे यांची उपस्थिती होती.

### सरपंच देशमुख यांच्या खुनाच्या

करण्याच्या घटना घडत आहेत यामध्ये बीडचा बिहार झाल्याची चर्चा संपूर्ण बीड जिल्हा नागरिकांमधून होत आहे यामध्ये गेल्या दोन-तीन दिवसापूर्वी केज तालुक्यातील मसाजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांची काही गुंड यांनी निर्घृणपणे अपहरण करून हत्या केली या घटनेचा बीड जिल्ह्यामध्ये संताप व्यक्त केला जात असून ठीक ठिकाणी आंदोलने होत आहे याचे पडसाद आता संपूर्ण महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात उमटल्याचे पहावयास मिळत असून आज या घटनेचा निषेध म्हणून वडवणी तालुका वाशीयांनी वडवणी बंदची हाक दिली होती त्यामध्ये सकल मराठा समाज व सर्व राजकीय पक्षाच्या वतीने काल वडवणी शहरासह तालुक्यात कडाकडीत बंद पाळला यामध्ये वडवणी शहरात तरूण युवक रस्त्यावर उतरले यामध्ये शहरात पायी रॅली काढून या खुनाच्या घटनेतील राजकीय वरदहस्त असणाऱ्या मुख्य सूत्रधाराला अटक करण्याची मागणी करण्यात आली तसेच यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने तहसीलदार यांना लेखी निवेदन देण्यात आले यावेळी हजारो मराठा तरुण या आंदोलनात सहभागी झाल्याचे पहावयास मिळाले तरी वडवणी शहरात कसलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### सासरवाडीत जावयाचा खून

जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सी. व्ही. ठुबे, भगवान नरोडे, विष्णू चव्हाण, मुंढे, देवा टेंगल, अलका केंद्रे, यांनी तत्काळ घटनेचा तपास करून अवघ्या काही तासांत गोरख बळीराम गायकवाडसह काही अन्य लोकांना ताब्यात घेऊन खाक्या दाखवत खून केल्याचा गुन्हा उघडकीस आणला.

दरम्यान याप्रकरणी मयताचा भाऊ प्रदीप विष्णू थोरात यांच्या फिर्यादीवरून आरोपी पत्नी वर्षा दत्ता थोरात, सासरे बळीराम किसन गायकवाड, मेहना गोरख बळीराम गायकवाड व अनिल बाबुराव सव्वाशे यांच्या विरुद्ध अंबड पोलिसात खुनाचा गुन्हा दाखल करून चौघांना अटक करण्यात आली नंतर आज आरोपींना अंबड न्यायालयामध्ये हजर केले असता आरोपींना सोमवार पर्यंत पाच दिवस पोलीस कोठडी देण्यात आली.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.१३ डिसेंबर २०२४
४

# २२ जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना २ हजार ९२० कोटी रुपयांचा मदत निधी मंजूर

## शासन निर्णय प्रसिद्ध

मुंबई : जून ते ऑक्टोबर २०२४ या महिन्यात अतिवृष्टी आणि पुर यामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्तांकडून निधी मागणीचे प्रस्ताव राज्य सरकारला प्राप्त झाले. त्यानुसार आपत्ती बाधित शेतकऱ्यांना १ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्याचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे.

राज्यात जून ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान बहुतांश जिल्ह्यात अतिवृष्टी, पुरस्थिती निर्माण झाली. त्यामुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे राज्य सरकारने जून ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी २ हजार ९२० कोटी ५७ लाख पन्नास हजार रुपयांच्या मदतनिधी वितरणाला मंजूरी दिली आहे. शासननिर्णय मंगळवारी (दि.१०) निर्गमित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक आणि पुणे विभागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. या चार विभागातील २२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना अतिवृष्टी मदतीचं वाटप



करण्यात येणार आहे. जून ते ऑक्टोबर २०२४ या महिन्यात अतिवृष्टी आणि पुर यामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्तांकडून निधी मागणीचे प्रस्ताव राज्य सरकारला प्राप्त झाले. त्यानुसार आपत्ती बाधित शेतकऱ्यांना १ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्याचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे. तसेच डीबीटीच्या म्हणजेच थेट लाभ हस्तांतरण पोर्टलमधून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधी वितरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

### या २२ जिल्ह्यांचा समावेश

छत्रपती संभाजीनगर विभागातील जालना, हिंगोली, परभणी, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, लातूर या जिल्ह्यांचा यामध्ये समावेश आहे. तर पुणे विभागातील सातारा, सोलापूर आणि सांगली तसेच नाशिक विभागातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्याचा समावेश आहे. नागपूर विभागातील वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपुर या जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मंजूर करण्यात आला आहे.

## कृषी विद्यापीठ राहुरी आणि बारामती केव्हीके यांच्यात करार

### शेतकऱ्यांना होणार फायदा




पुणे : राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ (एमपीकेव्ही) व बारामतीतील ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्रातील (केव्हीके) भाजीपाला गुणवत्ता केंद्र यांच्यामध्ये करार करण्यात आला आहे. पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी अभ्यासक्रमांतर्गत करावयास लागणारे आधुनिक तंत्रज्ञान आधारित संशोधनाचे काम करण्याकरिता पाच वर्षांकरिता सामंजस्य करार करण्यात आला आहे.

हा सामंजस्य करार करताना महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. सताप्पा खरबडे, कृषी विज्ञान केंद्रातील भाजीपाला गुणवत्ता केंद्राचे प्रकल्प प्रमुख यशवंत जगदाळे आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.या सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थ्यांना शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञान, जसे की भाजीपाला कलम तंत्रज्ञान, मातिविना शेती, कृषी क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञान आणि पिकांचे खत व पाणी व्यवस्थापन अशा विविध विषयांवर संशोधन करता येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे हे संशोधन पूर्ण झाल्यानंतर याची शिफारस विद्यापीठामार्फत करण्यात येणार असून याचा नक्कीच फायदा शेतकरी बांधवाना होणार आहे.

हा सामंजस्य करार करण्याकरिता महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. व्ही. एस. शिर्के, उद्यानविभागाचे प्रमुख डॉ. बी. टी. पाटील, उद्यान विभागाचे प्राध्यापक डॉ. डी. बी. क्षीरसागर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार व मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश नलावडे आणि डॉ. धीरज शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

## हरभरा पिकासाठी अशा पद्धतीने द्या पाणी

रब्बी हंगामातील हरभरा हे एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. अनेक कोरडवाहू शेतकरी खरीप हंगामाअखेर पडलेल्या पावसाच्या ओलीचा फायदा घेत हरभरा पेरणी करतात. ज्यांच्याकडे पाण्याची सुविधा आहे, त्यांनी योग्य सिंचन व्यवस्थापन केल्यास अधिक उत्पादन मिळवणे शक्य आहे.

सिंचन व्यवस्थापनाची महत्त्वाची सूत्रे : उगवणीनंतर पहिले पाणी पीक कळीवर असताना (४० ते ४५ दिवसांनी), दुसरे पाणी घाटे भरतेवेळी (७० ते ७५ दिवसांनी) द्यावे. मर्यादित ओलीत असल्यास कमीत कमी एक ओलीत घाटे भरतेवेळी द्यावे. रुंद वरंबा सरीमध्ये दोन ओळींत ओलीत केल्यास पाण्याची ३० टक्के बचत होते. उत्पादनात २० टक्के वाढ मिळते. मध्यम जमिनीत २० ते २५ दिवसांनी पहिले, कळी असताना दुसरे व घाटे भरतेवेळी तिसरे पाणी द्यावे. हलक्या जमिनीवर घेतलेल्या हरभऱ्याला मात्र पिकाची स्थिती पाहून उगवणीनंतर आवश्यकतेनुसार ओलीत करावे. अधिक प्रमाणात पाणी दिल्यास पीक उभळण्याचा धोका असतो. जमिनीचा प्रकार आणि खोलीनुसार पाण्याच्या दोन पाळ्यांमध्ये अंतर ठेवावे. मात्र जमिनीस भेगा पडू देऊ नयेत. पाणी साचू देऊ नये.मूळकुजव्या रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. हरभरा पिकास एक ओलीत दिल्यास उत्पादनात ३० टक्के वाढ होते, तर दोन ओलीत दिल्यास ५२ टक्क्यांपर्यंत वाढ होते.तुषार सिंचन पद्धती फायदेशीर : हरभरा हे पीक पाण्यास संवेदनशील पीक असून, साधारणपणे २५ सें.मी. पाण्याची आवश्यकता असते. सुधारित वाणाची लागवड करून त्याला तुषार सिंचनाची जोड दिल्यास उत्पादनात वाढ होते. तुषार सिंचनामुळे पीक उभळण्याचा धोका कमी होतो. आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या टप्प्यावर पाणी देता येते. सारा, पाट, वरंबा यासारख्या पद्धतीने पाणी दिल्यास जमीन दाबून बसते. या पद्धती राबविण्यास मशागतीसह खर्चात वाढ होते. या पद्धतीमुळे जमिनीचा भुसभुशीतपणा कमी होतो. त्याचा उत्पादनावर परिणाम होतो. त्या तुलनेत तुषार सिंचनाने जमीन नेहमी भुसभुशीत राहते. कोणतीही मशागत अतिशय सुलभ करता येते. तुषार सिंचनाने जमीन ओलावून मशागतीनंतर तिफण किंवा पाभरीच्या साह्याने काकऱ्या पाडल्या जातात. त्यात हरभरा बियाणे टोकण केल्यास पिकाची उगवण अतिशय चांगली होते.पारंपरिक पाटपाणी पद्धतीने पाणी देताना अधिक पाणी दिले गेल्यास पाणी साचून मूळकुज सारख्या रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. ही समस्या तुषार सिंचनाने पाणी अनेकदा विभागून देता येत असल्याने टळते. या पद्धतीत वाफसा स्थिती दीर्घकाळ टिकून राहते. परिणामी, पिकास दिलेली खते, अन्नद्रव्ये यांची उपलब्धता वाढते.



# भाजीपाला उत्पादन वाढीसाठी ‘रिले क्रॉपिंग’ पद्धती फायद्याचीच

भाजीपाला लागवडीच्या वेगवेगळ्या पद्धतीद्वारे शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यातीलच एक पद्धती आहे रिले क्रॉपिंग. शेतकरी भाजीपाला पिकांचे चांगले उत्पादन मिळविण्यासाठी रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब करू शकतात. रिले क्रॉपिंग सिस्टीम हे एक तंत्र आहे ज्याद्वारे एकाच जमिनीवर वेगवेगळ्या भाज्यांची लागवड करता येते. हे एक खास शेती तंत्र आहे ज्याचा अवलंब करून शेतकरी अधिक उत्पादनासोबतच उत्पन्न वाढवू शकतात. विशेष म्हणजे यामध्ये मागील पीक काढण्यापूर्वी पुढील पीक पेरले जाते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञान काय आहे? :रिले क्रॉपिंग सिस्टीम ही एक प्रणाली किंवा तंत्र आहे ज्यामध्ये एका शेतात एक पीक लावले जाते, तर मागील पिकातील उर्वरित ओलावा आणि पोषक तत्वांचा फायदा घेण्यासाठी त्याच शेतात दुसरे पीक नंतर लावले जाते. यामध्ये पहिले पीक काढण्यापूर्वी दुसरे पीक पेरले जाते. त्यामुळे पहिल्या पिकातील ओलावा दुसऱ्या पिकात जातो त्यामुळे सिंचनाची कमी गरज भासते, म्हणजेच कमी सिंचनात जास्त पिकांना या पद्धतीचा फायदा होऊ शकतो. जमीन आणि संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आणि उत्पादन वाढवण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरू शकते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञानाचे फायदे :भाजीपाल्याचे बहुपिक घेतल्याने जास्त उत्पादन मिळते. बहुपीक शेतीमुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढू शकते. या तंत्रज्ञानाचा अवलंब करून वर्षभर



रोजगार मिळू शकतो म्हणजेच वर्षभर पैसा मिळवता येतो. मोठ्या प्रमाणात खताची आवश्यकता नसते. खताचा वापर संतुलित प्रमाणात केला जातो. पीक फेरपालटद्वारे जमिनीचे आरोग्य राखता येते. पाण्याच्या बचतीबरोबरच जमिनीची सुपीकताही राखता येते. या तंत्राने चांगले उत्पादन मिळू शकते, तथापि, पिकाचे चांगले उत्पादन हे जातीची निवड, योग्य पेरणीची पद्धत, संसाधनांचा योग्य वापर, कीड व्यवस्थापन, वेळेवर काढणी या गोष्टींवर अवलंबून असते.

या तंत्राने या भाज्यांची लागवड करता येते : काकडीसह मिरचीची लागवड –बहुपिक शेतीत काकडींसोबत मिरचीची लागवड करता येते. यामध्ये रिले क्रॉपिंग तंत्राचा वापर करून नोव्हेंबर ते मार्च आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर अशी दोनदा पेरणी केली जाते. मिरचीची पेरणी फेब्रुवारीमध्ये शेताच्या बांधावर केली जाते.

मटारसह दुधीभोपळा लागवड – या तंत्रात नोव्हेंबर ते एप्रिल आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर या कालावधीत शेती केली जाते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिवाळ्यात दुधीभोपळ्याची रोपवाटिका प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये तयार करावी आणि ती फेब्रुवारीमध्ये तयार केलेल्या बेडमध्ये २.५ मीटर ४५ सें.मी. अंतरावर दोन्ही बाजूला लागवड करावी.

काकडी आणि घोसाळे लागवड – या तंत्राने नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत काकडी आणि घोसाळ्याची लागवड केली जाते. याशिवाय मार्च ते ऑक्टोबर दरम्यानही लागवड करता येते. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की घोसाळ्याची पेरणी किंवा रोपण मार्चमध्ये ३ मीटर अंतरावर करावे.

या पिकांची रिले क्रॉपिंग करू नये : अशी अनेक पिके आहेत ज्यांची एकत्र पेरणी करू नये कारण अशाच प्रकारच्या भाज्या कीटक किंवा रोगांना संवेदनशील असतात. ते एकत्र घेतल्याने पिकाचे कीड व रोगांमुळे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते. उदाहरणार्थ, पीक पद्धतीमध्ये टोमॅटो आणि मिरची एकत्र पेरता कामा नये.

या पिकांची एकत्रित लागवड केल्यास फायदा होतो :उथळ मुळे असलेल्या भाज्या नेहमी खोलवर रुजलेल्या भाज्यांनंतर लावल्या पाहिजेत जेणेकरुन ते मातीच्या सर्व थरांमधील पोषक द्रव्ये शोषून घेतील. उदाहरणार्थ, मटार आणि सोयाबीन यांसारख्या शेंगांची लागवड करणे खूप फायदेशीर ठरू शकते कारण ही पिके वातावरणातील नायट्रोजन शोषून घेतात आणि ते जमिनीत साठवून ठेवतात ज्यामुळे इतर वर्गातील पिकांना फायदा होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८७ : ला पेनसिल्वेनिया हे अमेरिकेचेसंविधानस्विकार करणारे दुसरे राष्ट्र बनले.
१७५५ : डच इस्ट इंडिया कंपनीचे निकोबार येथे आगमन
१८०० : ला वॉशिंग्टन डीसी अमेरिकेची राजधानी बनले.
१८८२ : अनंदमठ या बंकिमचंद्र यांच्या कादंबरीचे प्रकाशन, याच कादंबरीमध्ये वंदे मातरम्? हे गीत आहे.
१८८४ : ला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांमध्ये क्रिकेट सामना खेळला गेला जो अधिकृत रित्या पहिला होता.
१९०१ : जी. मार्कोनी याला प्रथमच बिनतारी संदेशाचे अटलांटिक महासागर पार प्रक्षेपण करण्यात यश मिळाले.
१९११ : दिल्ली ही भारताची राजधानी करण्यात आली. या आधी कोलकाता ही भारताची राजधानी होती.
१९११ : ला जॉर्ज पाचवा भारतामध्ये आला होता.
१९१७ : ला इटली येथील फ्रेंच आल्प्स येथे फ्रान्स च्या सैन्याची रेल्वे रुळावरून रेल्वे घसरून ५४३ लोकांचा मृत्यू.
१९२३ : ला इटलीच्या गंगा मानल्या जाणाऱ्या नदीवरील बांध फुटल्यामुळे ६०० च्या जवळपास लोक मारल्या गेले होते.
१९३६ : ला चीन चे नेता च्यांग काई शेक यांनी जपान विरुद्ध युद्धाची घोषणा केली होती.
१९५८ : ला जिनिया हा देश संयुक्त राष्ट्र संघाचा सदस्य बनला.
१९६३ : ला केनियाला स्वातंत्र्य मिळाले.
१९७१ : संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करण्यात आले.
१९९० : ला टी. एन. शेषन हे भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त बनले.
१९९६ : ला भारत आणि बांग्लादेश यांच्या मध्ये ३० वर्षापर्यंत गंगेचे पाणी वाटण्याच्या करारा वर सह्या झाल्या होत्या.
२००१ : पृथ्वी या क्षेपणास्त्राची चाचणी करण्यात आली.
२००१ : आशा भोसले यांना दादासाहेब फाळके पुरस्कार
२००१ : ला भारताने नेपाळ ला दोन चीता हेलिकॉप्टर आणि काही अवजारे दिली होती.
२००८ : ला कर्नाटक चे माजी मुख्यमंत्री एम वीरप्पा मोइली यांनी सरकारी कर्मचारी यांच्या सेवा मंडळांमध्ये बदलाव करण्यासाठी शिफारस केली.
२०१६ : प्रियांका चोप्रा यांना युनिसेफ सदिच्छा दूत म्हणून नेमण्यात आले.
२०२१ : हरनाज कौर संधूने मिस युनिव्हर्स २०२१ जिंकली

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८१ : वॉर्नर ब्रदर्स चे सहसंस्थापक हॅरी वॉर्नर यांचा जन्म. (मृत्यू: २५ जुलै १९५८)
१८७२ : डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे राजकीय नेते, हिन्दू महासभेचे संस्थापक, अध्यक्ष आणि सरचिटणीस, लष्करीकरणाचे प्रवर्तक आणि नाशिक येथील 'भोंसला मिलिटरी स्कूल'चे संस्थापक (मृत्यू: ३ मार्च १९४८)
१८९२ : गौरीशंकर गोवर्धनराम जोशी तथा 'धूमकेतू' गुजराथी कथाकार व कादंबरीकार. त्यांच्या ७ उत्कृष्ट कथांचा संग्रह 'सप्तपर्ण' या नावाने प्रकाशित झाला आहे. (मृत्यू: ११ मार्च १९६५)
१९०५ : डॉ. मुल्कराज आनंद लेखक (मृत्यू: २८ सप्टेंबर २००४)
१९०७ : खेमचंद प्रकाश संगीतकार (मृत्यू: १० ऑगस्ट १९५०)
१९१५ : फ्रँक सिनात्रा हॉलिवूड मधील अभिनेते व गायक (मृत्यू: १४ मे १९९८)
१९१९ : ला भारतीय क्रिकेटर भाऊसाहेब निंबाळकर यांचा जन्म.
१९२७ : इंटेल कॉर्पोरेशनचे सहसंस्थापक रॉबर्ट नोयस यांचा जन्म. (मृत्यू: ३ जून १९९०)
१९४० : शरद पवार केंद्रीय कृषी मंत्री, संरक्षण मंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
१९४५ : संसद आणि लोकसभेचे सदस्य माजीद मेमन यांचा जन्म.
१९४९ : महाराष्ट्राचे लोकनेतेगोपीनाथ पांडुरंग मुंडेयांचा जन्म.
१९४९ : तमिळ तसेच हिंदी चित्रपटांचे अभिनेते रजनीकांत यांचा जन्म.
१९५२ : भारतीय कॅनेडियन व्यापारी आणि राजकारणी हरब धालीवाल यांचा जन्म.
१९५४ : मुंबई येथे २६/११ च्या झालेल्या दहशदवादी हल्यात शहीद झालेले हेमंत करकरे यांचा जन्म.
१९७३ : मराठी चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध सुपर स्टार भरत जाधव यांचा जन्म.
१९७८ : मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार उमेश कामत यांचा जन्म.
१९८१ : युवराजसिंग भारतीय क्रिकेटपटू
१९८४ : मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार संतोष जुवेकर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३० : परदेशी मालाविरुद्ध निदर्शने करताना हुतात्मा बाबू गेनू याचा मोटारीखाली चिरडून मृत्यू (जन्म: ? ? १९०८)
१९६४ : मैथिलिशरण गुप्त हिन्दी कवी. त्यांचे सुमारे ४० स्वतंत्र ग्रंथ आणि ६ अनुवादित ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांच्या 'भारतभारती' या काव्यग्रंथामुळे त्यांना राष्ट्रकवी म्हणून मान्यता मिळाली. (जन्म: ३ ऑगस्ट १८८६)
१९९१ : दत्तात्रय गणेश तथा अप्पासाहेब शेंबेकर शेतीतज्ञ व बागाईतदार, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे संस्थापक अध्यक्ष (१९६३ १९६६)
१९९२ : पं. महादेवशास्त्री जोशी साहित्यिक, भारतीय संस्कृतीकोषाचे व्यासंगी संपादक (जन्म: १२ जानेवारी १९०६ आंबेडे, सातेरी, गोवा)
२००० : जयदेवप्पा हलप्पा तथा जे. एच. पटेल कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री (३१ मे १९९६ ७ आक्टोबर १९९९) (जन्म: १ आक्टोबर १९३०)
२००५ : रामानंद सागर हिन्दी चित्रपट निर्माते (जन्म: २९ डिसेंबर १९१७)
२००६ : सीगेट टेक्नोलॉजी चे सहसंस्थापक ॲलन शुगर्ट यांचे निधन. (जन्म: २७ सप्टेंबर १९३०)

# बार ॲण्ड रेस्टॉरंट चोरी, घरफोडी करणारी टोळी अटक

जालना। प्रतिनिधी

बार व घरफोडी करणारी टोळी पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी आरोपीतां कडून १३,०६,९२०/- रुपये किमंतीचे वेगवेगळ्या कंपनीचे विदेशी दारु व बिअर चे बॉक्स जप्त करुन जिल्ह्यातील ०६ गुन्हे उघड स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे.



जालना जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे येथे बार ॲण्ड रेस्टॉरंट फोडून घरफोडी चे गुन्हे दाखल आहे. सदर घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखा जालना येथील पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, स्थागुशा जालना यांनी गुन्हे उघडकीस आणणे बाबत स्थागुशा चे एक विशेष तपास पथक तयार करुन पथकातील पोलीस अधिकारी व अंर्मलदार यांना सुचना देऊन मार्गदर्शन केले. पथकातील अधिकारी व अंर्मलदार हे गुन्हेगाराची माहिति घेत असतांना त्यांना दिनांक १०/१२/२०२४ रोजी माहिति मिळाली की, मौजे घनसावंगी येथील चैतन्य बार ॲण्ड रेस्टॉरंट येथील विदेशी दारु चे वॉक्स व विअर चे वॉक्स ची चोरी हि महेश राजेंद्र तबले रा.मादळमोही ता. गेवराई जि. बीड हमु घनसावंगी याने त्याचे साथीदारास केल्याची माहिति मिळाली. त्या अनुषंगाने नमूद आरोपीताचा शोध घेतला असता त्यास ताब्यात घेऊन गुन्हे संबंधाने विचारपुस करता त्याने सदर ठिकाणी त्याचे साथीदारास वेगवेगळ्या विदेशी कंपनीचे दारुचे वॉक्स ची चोरी केल्याचे कबूल केले नमूद आरोपी व त्याचा साथीदार नामे प्रेमराज ऊर्फ किशोर दशरथ देवकर रा. मादळमोही ता. गेवराई यास ताब्यात घेऊन त्यांचे कडून गुन्ह्यात चोरी केलेला वेगवेगळ्या कंपनीचे विदेशी दारु चे बॉक्स व चोरी करण्यासाठी वापरलेले वाहन असा एकूण १०,४७,३२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच नमुद आरोपी चे ताब्यातुन अधिक इतर ठिकाणाचा मुद्देमाल मिळाल्याने त्या अनुषंगाने मिळालेल्या माला संबंधी जिल्ह्यातील पोलीस ठाणेस दाखल गुन्ह्याची माहिति घेतली असता, पोलीस ठाणे घनसावंगी येथे दोन गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीकडे अधिक तपास केला असता आरोपी महेश राजेंद्र तवले पाने त्यास काही माल हा शेख इरफान ऊर्फ बबलु शेख उस्मान रा. घनसावंगी याने दिल्याचे निष्पन्न झाल्याने शेख इरफान शेख उस्मान यास ताब्यात घेऊन विचारपूस करता त्याने आकाशसिंग नरसिंग बाबरी व तकदिरसिंग टिटुसिंग टाक दोन्ही रा. मंगळबाजार जालना यांनी दोन तिन वेळा वेगवेगळ्या कंपनीचे विदेशी दारु चे बॉक्स व विअर चे बॉक्स विक्री साठी आणून दिल्याचे सांगितले. आकाशसिंग नरसिंग बाबरी व तकदिरसिंग टिटूसिंग टाक दोन्ही रा. मंगळबाजार जालना यांना ताब्यात घेऊन त्यांचे कडे विचारपुस करता त्यांनी पोलीस ठाणे घनसावंगी हद्योत तोन ठिकाणी, पोलीस ठाणे बदनापुर हथीत दोन ठिकाणी व पोलीस ठाणे परतुर हथीत एका ठिकाणी असे सहा ठिकाणी असलेल्या बार ॲण्ड रेस्टॉरंट ला चोरी केल्याचे कबुल केले आहे. नमुद आरोपीतांकडून गुन्ह्यातील चोरी गेलेला वेगवेगळ्या कंपनीचे विदेशी दारु चे बॉक्स व विअर चे बॉक्स असा एकुण १३,०६.९२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केरण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव, सपोनि, श्री. योगेश उबाळे पोउपनि राजेंद्र बाध, पोहवा सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पहरे, लक्ष्मीकांत आडेप, सुधिर वाघमारे, प्रशांत लोखंडे, फुलचंद गव्हाणे, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, आक्कुर धांडगे, कैलास चेके, धिरज भोसले, योगेश सहाने, सोपान क्षीरसागर, भागवत खरात, सौरभ मुळे यांनी केली आहे.

# स्व गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील भारतीय जनता पार्टी संपर्क कार्यालयात लोकनेते स्व गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना भाजपा तालुका अध्यक्ष आरुणराव आबा राऊत,माजी नगराध्यक्ष डॉ अशोकराव तिडके,भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर (माऊली) सरवदे, भाजपा माजी तालुकाध्यक्ष हनुमान कदम, डॉ.जुजगर, शिवसेनेचे माजी नगरसेवक नितीन मुदंडा,भाजपा नेते सत्यनारायण उनवने, ज्ञानेश्वर, परशुराम सेवा संघाचे तालुका अध्यक्ष सतिश जोशी, डॉ.तौर,ईश्वर खुर्पे बाळासाहेब क्षीरसागर, भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे जिल्हा सरचिटणीस अविनाश कांडुरे, शरद पवार, बाळासाहेब साळवे, रामराव जाधव, संतोष जाधव, विशाल देवकते, रामभाऊ शिंदे, चिंतेश जोशी तात्या पांचाळ यांची उपस्थिती होती.

# पिंपळवंडी परिसरात कांदा पिकावर चोरांचा डल्ला

## शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

पिंपळवंडी। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील जरेवाडी येथील शेतकरी सोनाजी दगडू जरे यांच्या गोरसाळा शेताजवळील येरमाळा वावरातील सरीवर काढून ठेवलेला अंदाजे ५० हजार रुपयांचा कांदा दि.११/१२/२०२४ बुधवारचे रात्री ७ ते ८ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरांनी चोरून नेल्याचा प्रकार घडल्याने परिसरात शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.कांदा चोरीच्या घटनेची गुरुवार रोजी पिंपळवंडी व परिसरात चर्चा होत होती.



रात्रंदिवस मेहनत करून शेतकऱ्याने कांदा पीक जोपासले होते.सध्या कांद्याला चांगला भाव मिळत असल्याने मोठ्या अपेक्षेने शेतकऱ्याने कांदा पीक काढून विक्रीसाठी तयारी करीत असताना रात्रीतूनच अज्ञात चोरट्यांनी कांदा पळविल्याचे गुरुवारी सकाळी संबंधित शेतकऱ्याच्या लक्षात आल्याने त्यांच्या तोंडचे पाणीच पळाले.सोयाबीन,उडीद, कापूस पिकांना कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी परेशान आहे.त्यामध्ये रानडुकरे पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी करीत आहेत.त्यामुळे शेतकरी नैसर्गिक व वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या पिकांच्या दुहेरी संकटात सापडला आहे. त्यावरही मात करून रात्रंदिवस मेहनत घेऊन मोठ्या कष्टाने उत्पादन घेण्यासाठी धडपडत आहे.या संकटातून जे पदरात पडेल त्यावर समाधान मानत आहे.हाता-तोंडाशी आलेले कांदा पीक रानडुकराच्या जबड्यातून कसे-बसे वाचलेत पण दोन पायांच्या डुकरांनी रात्रीतून कांदा पळविल्याने शेतकऱ्यांनी शेती करावी की पडीक टाकावी असाही प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला आहे.

# स्व. गोपीनाथराव मुंडे आणि खा.शरद पवार यांचे महाराष्ट्राच्या जडण-घडणीत मोठे योगदान

## राजेभाऊ फड यांच्या कार्यालयात विविध कार्यक्रम; अनेकांची प्रमुख उपस्थिती

परळी। प्रतिनिधी

गोरगरीब, कष्टकारी आणि कामगार वर्गाचा उद्धार करण्यासाठी स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी आपले संपूर्ण अतुष्य वेचले. कायम सत्तेच्या विरोधात संघर्ष करत सर्वसामान्य नागरिकांना न्याय आणि हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. अठरापगड जाती - धर्माच्या लोकांना सोबत घेऊन समाजकारण आणि राजकारण केले. स्व. मुंडे साहेबांनी सर्वसामान्य जनतेच्या राजकीय उत्कर्षांसाठी नेहमीच प्रयत्न केले तर जाणते राजे शरदचंद्र पवार यांनी आपल्या राजकीय आयुष्यात देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात मोठे योगदान दिले. शेतकरी, कष्टकरी वर्गाबरोबरच राज्याच्या औद्योगिक आणि व्यावसायिक उन्नतीला नवे वळण लावले अशा प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या. स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती तर जाणते राजे शरदचंद्र पवार यांचा वाढदिवस युवक नेते राजेभाऊ फड



यांच्या संपर्क कार्यालयात साजरी कारण्यात आली.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांच्या वतीने दि.१२ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. तर जाणते राजे शरदचंद्र पवार यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त केक कापून व फटाके फोडून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पक्षाचे जेष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, उत्तमराव माने, जिल्हा उपाध्यक्ष बाबा शिंदे, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यु.फड, शिवराज साखरे, सिरसाळा येथील माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद किरवले, जेष्ठ नेते विश्वनाथ गायकवाड, कैलास सोळंके, महादेव मामा मुंडे, महिला आघाडी तालुकाध्यक्ष वर्षाताई रायभोळे, युवती अध्यक्ष दिपाली सावंत, अश्विनीताई सोळंके, मंगलताई सोळंके, अश्विनी गायकवाड, गोपाळ सलगर, ज्ञानेश्वर खटके, विठ्ठल खडके, व्यंकटेश निर्मळ, नरसिंह निर्मळ, महेश मुंडे, समाधान मुंडे, विनायक नरवाडकर, अभिषेक केंद्रे, दगडोबा मुंडे, सिद्धेश्वर गुट्टे, शुभम बदने यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. गुरुवारी आयोजित कार्यक्रम प्रसंगी स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांना अभिवादन करतांना त्यांच्या अनेक आठवणींना उपस्थित मान्यवरांनी उजाळा दिला तर खा. शरदचंद्र पवार साहेबांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य लाभावे यासाठी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमास उपस्थित सर्वांना अल्पोपहार देण्यात आला.

# चंदनझिरा पोलीस ठाणे हद्दीत ट्रक चालकावर गोळीबार

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील चंदनझिरा पोलीस ठाणा हद्दीत टोलनाक्याजवळ हा गोळीबार करण्यात आला याप्रकरणी गोळीबार करणार्या मुख्य आरोपीस मुंबईत पोलिसांनी अटक केली. ही कारवाई पोलिसांनी केली.



१० डिसेंबर रोजी रात्री ०९.३० वा सुमारास यातील फिर्यादी रिझवान असाउद्दीन सावत हा त्याची ट्रक नागेवाडी टोल नाक्याजवळ पार्कीग मध्ये लावून चहा पिण्यासाठी टोल नाक्याजवळ असलेल्या हॉटेलवर चहा पिण्यासाठी जात असतांना त्याचा नातेवाईक साडु- शेर अलो मुस्ताक शेख उर्फ फत्ते हा एका पांढर्या रंगाच्या चार चाकी गाडी मध्ये त्याचे साथीदारा सह येवुन त्यांचे घरगुती वादातुन शेर अली याने त्याचे साथीदारासह येवुन मारहाण करुन त्याचे ताब्यातील गावठी कट्याने फिर्यादीच्या दिशेने कट्यामधुन ३ राउंड फायर केले त्यात फिर्यादीस जखमी केले व आरोपी त्याचे साथीदारासह कारमध्ये बसुन फरार झालें सदर घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अपर पोलीस अधीक्षक श्री नोपानी साहेब, उप विभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी ', चंदनझिरा प्रभारी अधिकारी प्रो.डि.वाय.एस.पी. श्रीमती करिश्मा चौधरी, सहा. पोनि चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देवुन आरोपी गेल्या दिशेने तात्काळ पोलीस पथक तयार करुन रवाना केले. तसेच सदर जखमी हा जिल्हा रुग्णालय जालना येथे औषध उपचार करत असल्याने त्यांना समक्ष भेटुन त्यांचे कडुन घटनेची संपुर्ण माहिती घेवुन फिर्यादीने दिलेल्या तक्रारी वरुन पोस्टे चंदनझिरा येथे कलम १०९, ११५ (२).३(५) बि.एन.एस. सह कलम ३/२५ भा.ह.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात आरोपीच्या शोध कामी पाठविलेले पथकाने आरोपीचे ठाव ठिकाणे बाबत माहिती घेत थेट मुंबई गाठली व आरोपी शेर अली मुस्ताक शेख उर्फ फत्ते रा. झाकीर हुशेन चौक गवंडी नवी मुंबई यास मुंबई येथे मोठ्या शितापीने ताब्यात घेतले आहे. तसेच मुख्य आरोपीच्या साथीदारांचा शोध घेण्याचे काम चालु आहे. सदरची कार्यवाही मा. प्र. पोलीस अधिक्षक अयुष नोपाणी , मा. उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांचे मागदर्शनाखाली प्रो. डि.वाय.एस.पी. चौधरी, सपोनि श्री सुशिल चव्हाण, पोउपनि श्री सचिन सानप, सुरेश घडसिंग, पोहेकॉ कृष्णा तंगे, प्रशांत देशमुख, गजानन जारवाल, राजेंद्र पवार, पोना अभिजीत वायकोस व पोअं नवनाथ पाटील चालक ठाकुर व काकासाहेब बोटवे यांनी केली असुन प्रकरणी तपास प्रो. डि.वाय.एस.पी. चौधरी ह्या करीत आहेत.

# सामुदायिक गायत्री महायज्ञ व गीता पारायण

बीड। प्रतिनिधी

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड येथेआज मोक्षदा (वैकुंठ) एकादशी ,हिंदूधर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे आयोजन करण्यात येते.आज दि ११/१२/२४ रोजी गायत्री महायज्ञ, विष्णुसहस्रनाम व श्रीमद्? भगवद्गीता पारायण संपन्न झाले. या यज्ञ सोहळ्याचे पौरोहित्य रत्नपारखी काका यांनी केले.यशवंत नगर मधील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर येथे करण्यात आले होते . या गिता जयंती उत्सवां निमित्त श्रीमद्भगवद्गीता पूजन, विष्णुसहस्रनाम पारायण तसेच संपूर्ण भगवद्गीता ७०० श्लोक सामुदायिक रित्या पारायण करण्यात आले. या पारायण सोहळ्याला यशवंत नगर तसेच पंचक्रोशीतील असंख्य भाविक भक्त महिला व माता-भगिनी बसल्या होत्या.



यज्ञ समारोपानंतर या गीता श्लोकाचे सार्वजनिक पठण करण्यात आले, अतिशय भक्तीमय व आनंदी वातावरणात यज्ञ हवन सोहळा व गीता पारायण समारंभ मोठ्या थाटात संपन्न झाला, या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ कीर्तनकार व गीता परिवाराचे ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांचं मोलाच मार्गदर्शन लाभलं त्यांच्या मार्गदर्शनाने हा गीता जयंती उत्सव मोठ्या थाटात व आनंदी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम विलास लेंबे ,मुकुंद भुतपल्ले, तुकाराम पंत जोशी, यांनी घेतले. या कार्यक्रमाला डॉ.ओंकार परदेशी, परदेशी काका,पीएसआय मेढे, मुंडे साहेब, बियानी साहेब, बियाणी ताई,रेवतीताई पोकळे, सुलोचनाताई उगलमुगले, अनुराधा सानप. खेडकरताई,गोरक्ष मिसाळ, पोकळे काकू ,मुंडे ताई, वृंदावनी साळुंके, सौ लेंबे काकू, तुकाराम पंत, वाल्मीक चाटे, महावीर शेठ बोरा, मेहेत्रे साहेब, , सुचिता जोशी,मोरे काकु, सानप काकु, साईनाथ दुधाळ,भराटे सर, मुंडे साहेब, दै.चंपावती पत्र चे महादेव नाना साळुंके याबरोबरच यशवंत नगर परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# संत हेच भगवंताकडे जाण्याचा सोपा मार्ग दाखवतात

## माधव महाराज डाके यांचे लोळदगाव येथील कीर्तनातून प्रतिपादन

बीड। प्रतिनिधी

या भूतलावर जन्म मिळणे दुर्लभ असून, देवाची भेट होणे हेच मनुष्य जनमाचे सर्वोच्च साध्य आहे. भगवंत प्राप्तीचा हा सुलभ मार्ग दाखवणारे वाटाडे संतच असतात. असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक श्री.ह.भ.प .माधव महाराज डाके काठवडेकार यांनी लोळदगाव येथील श्री.क्षेत्र दत्त मंदिर येथे आयोजित वार्षिक अखंड हरिनाम सोहळ्यातील चौथे किर्तन पुष्प गुंफताना केले.ते पुढे म्हणाले की, एकदा का संतांची भेट झाली की ईश्वर प्राप्ती होतेच. नव्हे तर मनुष्य जन्मापासून कायमची मुक्ती मिळते. असे अनमोल विचार ह भ प माधव महाराज डाके यांनी मांडले काल बुधवार दिनांक ११/१२/ २०२४ रोजी गीता जयंतीच्या पावन पर्वावर बीड पासून जवळच असलेल्या श्री दत्त संस्थान लोळदगाव येथे चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात गीता जयंती व मोक्षदा एकादशीच्या पवित्र त्रिवेणी संगमावर डाके महाराज यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. त्या प्रसंगी ते बोलत होते.



कीर्तनाच्या निरूपणासाठी महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक तयाचा हरिक वाटे देवा या अभंगावर महाराजांनी सविस्तर चिंतन मांडले. पुढे आपल्या कीर्तन सेवेमध्ये डाके महाराज म्हणाले की, भगवंताची भेट होण्यासाठी अगोदर संत भेट महत्त्वाची आहे एकदा का संतांची भेट झाली की मग आपणास भगवंत भेटलाच म्हणून समजावे असा विश्वास डाके महाराज यांनी आपल्या कीर्तन सेवेच्या चतुर्थ पुष्प माले मधून विचार मांडले. हे सर्व पटवून देण्यासाठी महाराजांनी नारद आणि रावणाची भेट हा प्रसंग सांगितला. याबरोबरच राक्षस कुळामध्ये जन्म घेऊन सुद्धा भक्त प्रल्हादने नामस्मरणाने आपले कृत कल्याण साधले. याबरोबरच भगवंताची दया आणि करुणा सांगताना विष पाजण्यास आलेल्या पुतनेला देखील त्या भगवंताने मोक्ष प्रदान केला हे सप्रमाण विषद केले. सदरील कीर्तन सेवेतील उदाहरणे ऐकताना श्रोते अतिशय मंत्रमुग्ध झाले होते .काल मोक्षदा एकादशी व गीता जयंतीच्या निमित्ताने डाके महाराज यांनी भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर सांगितलेली गीता सोप्या शब्दात सांगितली. याबरोबरच गीतेमधील कित्येक श्लोक महाराजांनी सोप्या भाषेमध्ये समजावून सांगितले. याबरोबरच ग्रंथराज ज्ञानेश्वरी मधील संत भेटीचे महत्त्वही विशद केली. ज्ञानेश्वरीच्या ओव्या सांगून व त्याचा साध्या सोप्या भाषेमध्ये अर्थ सांगून त्यांचं महत्त्व आपल्या आयुष्यात संत संगती लाभणे हे भाग्याचेच आहे असे अनमोल विचार मांडले. कीर्तन सेवेनंतर मठाधिपती ह भ प गुरु वसंत महाराज यांनी डाके महाराज यांचा स्वतः फेटा बांधून शाल श्रीफळ देऊन आदर सत्कार केला. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कीर्तन सेवेला गायक सुग्रीव महाराज डाके व मृदंग साथ तालमणी नरहरी दळे यांची लाभली .यांच्या अप्रतिम मृदंग वादनाने व सुग्रीव महाराज यांच्या गायनाने किर्तन सेवेमध्ये अधिकच रंगत भरली. कीर्तनासाठी लोळदगाव,लिंबागव, शीदोड,किन्हीपाई,कुर्ला,आदी गावासाह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवा कार्यप्रशिक्षणार्थींच्या केलेल्या भरतीमध्ये मुदतवाढ देण्याची मागणी



जालना। प्रतिनिधी

सरकारच्या आदेशावरून शासनाने विविध विभागांमध्ये युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणून राज्यामध्ये दिनांक ९ जुलै २०२४ रोजी अध्यादेश काढून वेगवेगळ्या पात्रतेप्रमाणे युवा कार्य प्रशिक्षणार्थींची भरती केली होती. भरती करतानाच त्यांना सहा महिन्याचा कालावधी असल्याचेही निश्चित केले होते. हा कालावधी लवकरच संपणार आहे. परंतु आपल्या हातचे काम जाईल या भीतीने या तरुणाईने आतापासूनच सरकार दरबारी विनवणी करायला सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांच्या समूहाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रशिक्षणाचा कालावधी ११ महिन्यांनी वाढवून द्यावा अशी मागणी केली आहे.

दरम्यान जालना जिल्ह्यामध्ये सुमारे १२०० असे कार्य प्रशिक्षणार्थी आहेत जे मानधन तत्वावर शासन दरबारी काम करतात. त्यामध्ये दहावी पास विद्यार्थ्यांना सहा हजार रुपये, १२ वी पास आणि डिप्लोमा होल्डर असेल तर आठ हजार रुपये आणि पदवीधर असेल तर दहा हजार रुपये अशा वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये हे मानधन ठरवलेले आहे. या मानधनाच्या भरोशावर अनेक तरुणांनी आपले पुढील नियोजनही सुरू केले आहे. परंतु आता हा कालावधी संपुष्टात येणार असल्यामुळे त्यांच्यासमोर धोक्याची घंटा वाजत आहे.आज निवेदन देण्यासाठी पूनम साळवे, कविता धांडे, मनीषा टापरे, करण मगर, किशोर डोईफोडे, राहुल मस्के, लहू शेळके, सुखदेव भिसे, सागर खरात पूजा बोरुडे, दीपाली कळवणे, मोनाली उईके, आनंद तारक, अखिल शेख, मयुरी तुपे, मनोज गारखेडे आदींची उपस्थिती होती.

# अंबाजोगाई नगर पालिकेच्या आवारातच अतिक्रमण करणाऱ्यांना कोणाचे अभय ?

## नगर पालिकेच्या आवारातच झालेल्या अतिक्रमणाबाबत मुख्याधिकारी यांची भूमिका संशयास्पद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील विकास कामाच्या नावावर शहराचे अंतर्गत रस्ते व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमण धारकांचे नगरपालिका प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने त्यांनी केलेले अतिक्रमण काढण्यात आले होते.त्यावेळी शहरातील प्रमुख रस्ते बऱ्याच प्रमाणात मोकळे देखील झाले होते.पण शहरातील अतिक्रमण काढून शहरातील रस्त्याचे व नाल्यांचे काम पूर्ण करण्यात आले. ते काम झाल्यानंतर अतिक्रमण धारकांनी पुन्हा जैसे थी परिस्थिती केल्याचे दिसून येत आहे. अतिक्रमण धारकांनी नगरपालिका कार्यालयात येण्याजाण्याचा रस्ता देखील मोकळा सोडलेला नाही. नगरपालिकेचे कार्यालय त्याचसोबत दुय्यम प्रबंधक कार्यालय( रजिस्ट्री ऑफिस ) या





कार्यालयासाठी येणाऱ्यांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. या कार्यालयात शासकीय कामासाठी येणाऱ्या महिलांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. येणाऱ्या महिलांना कार्यालयात येनाऱ्या महिलांकडे अतिक्रमण केलेल्या जागेवर बसणारे अतिशय वाईट नजरेने बघून त्यांच्यावर वाईट कॉमेंट करताना आढळून येतात. त्यामुळे महिलांना शरमेने मान खाली घालुन पुढे वाट काढावी लागत आहे. अंबाजोगाई नगर परिषदेच्या मुख्याधिकारी देखील एक महिला आहेत . त्यामुळे त्या महिलांचे प्रश्न जाणू शकतात व त्या कार्यालयात येणाऱ्या महिलांबाबत गांभीर्याने व सहानुभूती पूर्वक विचार करतील अशी भावना महिला व्यक्त करत आहेत.

अंबाजोगाईच्या नगरपालिकेने शहरातील व्यापाऱ्यांसाठी व्यापारी संकुल तयार करून व्यापारासाठी उपलब्ध केले आहे. संकुलातील दुकाने देत असताना नगरपालिकेने दिलेल्या अटी मान्य करत दुकानाची आखणी करून दिल्या आहेत. दुकानदाराने आपल्या दुकानासमोरील ज्या पायऱ्या दिल्यात त्याच्या बाहेर आपल्या दुकानातील सामनापासून इतर लोकांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे असे असताना देखील आज या घडीला दुकानाच्या बाहेर १० ते १५ फुट अतिक्रमण केल्याचे दिसून येत आहे हे अतिक्रमण करणाऱ्याला नगरपालिकेच्या कोणत्याच अधिकाऱ्याचा धाक नाही का? का अतिक्रमणधारक यांना वाढीव जागा वापरण्यासाठी मासिक हप्ता मिळतो असे तर नाही ना? देत असेल तर तो कोणाला? हे चौकशीतुन समोर आल्याशिवाय राहणार नाही.नगरपालिकेत होत असलेल्या अतिक्रमणाबाबत विविध दैनिकांमध्ये बऱ्याच वेळी वेगवेगळ्या बातम्या छापून आल्या आहेत .तरी देखील या बातम्यांची दखल नगरपालिकेच्या मुख्यधिकारी यांनी आजपर्यंत घेतलेली दिसून येत नाही. शहरातील अतिक्रमण पुन्हा एकदा काढण्याची वेळ आली असताना एकदाही नगरपालिकेतल्या अतिक्रमण का काढले नाही असा सवाल शासकीय कामासाठी येणाऱ्या जाणाऱ्या यांच्याकडून होत आहे.

# अंबाजोगाई तालुक्यात महिलेचा संशयास्पद मृत्यू

**नातेवाईकांचा घातपाताचा आरोप**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील साकूड येथील रुक्मिणी ज्ञानोबा कराड (वय ४५) या महिलेचा आज गुरूवारी (दि.१२) सकाळी १० वाजता राहत्या घरी मृत्यू झाला. मात्र, त्या महिलेच्या नातेवाईकांनी मृत्यूबाबत संशय व्यक्त केल्याने या प्रकरणाची गुंतागुंत वाढली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रुक्मिणी कराड यांचा गुरुवारी सकाळी मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबियांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार २२ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजता रुक्मिणीबाई घराच्या गच्चीवर पाण्याचा टाकीत किती पाणी आहे हे पाहण्यासाठी गेल्या असता तोल जाऊन त्या खाली पडल्या. गंभीर जखमी झालेल्या रुक्मिणी यांच्यावर लातूर येथील रुग्णालयात उपचार करण्यात आले. काही दिवसांपूर्वी त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली. त्यानंतरही त्या घरी बहुतांशी वेळ झोपूनच होत्या. गुरुवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. मात्र, काही नातेवाईकांनी त्यांच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त केला आहे. रुक्मिणीबाईंना मारहाण झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांना असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. दरम्यान, रुक्मिणीबाईंचा मृतदेह स्वाराती रुग्णालयात हलविण्यात आला असून शवविच्छेदन झाल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण निष्पन्न होऊ शकणार आहे.

# रिपाइंच्या वतीने परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ निदर्शने ; तहसीलदारांना निवेदन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांच्यावतीने परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासमोर असणा-या संविधानाच्या प्रतिमेला दगडाने फोडून विटंबना करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याच्या कृतीच्या निदर्शन करण्यात यावे हे मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनात असे म्हटले आहे की, परभणी येथे स्टेशन रोड भागातील जिल्हाधिकारी कार्यालया समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. तेथे



संविधानाची सिमेंटपासुन बनवलेली प्रतिकृती असुन तिला काचेचे आवरण होते. एका माथेफिरूने दिनांक १०/१२/२०२४ रोजी सायंकाळी प्रतिकृतीची काच फोडली या कृत्यामुळे आपल्या भारत देशातील संविधानाचा अपमान झाला आहे. त्यामुळे संपुर्ण भारत देशातील संविधान प्रेमी यांच्या भावना दुखावल्या आहेत. या कृतीचा आष्टी तालुका रिपब्लीक पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांच्या वतीने जाहिर निषेध करित असुन सबंधीत आरोपी विरूध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. या निवेदनावर रिपाईचे नेते जिल्हा उपाध्यक्ष अरूण (भैय्या) निकाळजे, शशिकांत निकाळजे, सादीक कुरेशी,बाजीराव वाल्हेकर, बब्बूभाई अत्तार,सामाजिक कार्यकर्ते अशोक निकाळजे,नितिन निकाळजे, सागर खंडागळे,सागर निकाळजे, बबलू निकाळजे,संदेश निकाळजे, हर्षवर्धन निकाळजे, सम्राट औसरमाल,गनिराव भालेकर, हौसराव भालेकर,मिलींद निकाळजे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अमित लोमटे यांची सहाय्यक अभियंतापदी निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील भूमिपुत्र अमित राजेसाहेब लोमटे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा -२०२२ मधून जलसंपदा विभागात सहाय्यक अभियंता (विद्युत) वर्ग २ या राजपत्रित पदावर निवड झाली आहे.अमित लोमटे यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण सांगली येथून पूर्ण करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली होती. दोन दिवसांपूर्वी या परीक्षेचा निकाल जाहीर झाला.त्यात अमित लोमटे यांची जलसंपदा विभागात वर्ग दोन पदावर सहाय्यक अभियंता म्हणून निवड झाली आहे.यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.अमित लोमटे हे सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजेसाहेब लोमटे यांचे सुपुत्र आहेत.

# शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोहनराव जगताप यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

माजलगांव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.शरदचंद्र पवार यांच्या ८४ व्या वाढदिवसा निमित्त सामाजिक उपक्रम राबवत दहावी बारावी कला क्रीडा व इतर क्षेत्रांमध्ये नावलौकिक केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासाठी मोहनराव जगताप यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय माजलगाव येथे सत्काराचा



**सामाजिक उपक्रमातून शरद पवार यांचा वाढदिवस साजरा**

कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नारायणराव डक होते प्रमुख उपस्थितीमध्ये अरुणराव इंगळे, विश्वंभर थावरे, विलासराव बडे, युवराज लगड, संतोषराव यादव, सुनील शिंदे, दयानंद स्वामी, कचरू तात्या खळगे, माधव बाप्पा सोनवणे, डॉ.श्रीराम खळगे, रशीद भाई, श्रीहरी काळे, प्रभाकर नरवडे हे होते.

या कार्यक्रमाप्रसंगी मोहनराव जगताप यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशा बद्दल अभिनंदन व कौतुक केल्याने पुढील शिक्षणात वाटचालीसाठी त्यांना प्रेरणा मिळेल असे मत व्यक्त

पान ३ वर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर विटंबना प्रकरणी आज अंबड बंद

अंबड । प्रतिनिधी

परभणी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान तोडफोड प्रकरणी आज दिनांक १३ डिसेंबर रोजी अंबड बंद ठेवण्यात येणार भीम संघटनेच्या वतीने कळविण्यात येत आहे.सर्व व्यापारी व समाज बांधव यांना विनंतीपूर्वक सुचित करण्यात येत आहे की,परभणी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान तोड फोड जातीवादी व्यक्ती ने केली आहे याच निषेधार्थ अंबड शहर भारतीय संविधान प्रेमी यांच्या वतीने बाजार पेठ दिवस बंद ठेवण्यात येत आहे. याची रीतसर लेखी माहिती मा अंबड पोलीस निरिक्षक सतीश जाधव , व्यापारी महासंघ अध्यक्ष गोवर्धन भोरे, व्यापारी महासंघ अध्यक्ष दोरकादास भाऊ जाधव आदिना निवेंदन देण्यात आले.सर्वानी आपली दुकानें बंद ठेवून सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# त्या देशविरोधी कृत्य करणाऱ्या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

घनसावंगी । प्रतिनिधी

दि १० रोजी परभणी येथील जिल्हा अधिकारी कार्यलयासमोर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयासमोर भारतीय संविधानाची तोडफोड करणाऱ्या व्यक्तीस फक्त अटक न करता त्याच्यावर प्रशासनाने देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन कठोर कार्यवाही करावी अन्यथा संपुर्ण महाराष्ट्रात तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशार भीम आर्मीच्यावतीने देण्यात आला आहे.याविषयीचे निवेदन घनसावंगीचे पोलीस निरीक्षक केतन राठोड यांना देण्यात आले आहे.या घटनेच्या निषेधार्थ उद्या घनसावंगी तालुका बंदची हाक देण्यात



आली आहे अश्या मागण्याचे निवेदन तहसीलदार व घनसावंगी पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.यावेळी भीम आर्मीचे कार्यकर्ते तसेच भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने प्रकाश मुंडे यांना मदतीचा धनादेश सुपूर्द

**केज । प्रतिनिधी**

केज येथील पत्रकार प्रकाश मुंडे यांच्या मुलाचे काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले होते त्या पार्श्ववभूमीवर परिषदेचे विश्वस्त एस एम देशमुख यांनी काल मुंडे यांची सांत्वनपर भेट घेत परिषदेच्या वतीने मदतीचा धनादेश कुटुंबियांच्या हाती सुपूर्द केला.

पत्रकार प्रकाश मुंडे यांच्या मुलाचा पुणे येथे अपघात झाला



होऊन त्यात तो गंभीर जखमी झाला होता त्यावर पुणे येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार चालू होते परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला होता त्यामुळे मुंडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता दरम्यान काल परिषदेचे विश्वस्त एस एम देशमुख , डिजिटल मीडियाचे प्रदेश अध्यक्ष अनिल

पान ३ वर

# सरपंच देशमुख यांच्या खुनाच्या मुख्य सुत्रधाराला अटक करण्याच्या मागणीसाठी वडवणी तालुका कडकडीत बंद

**वडवणी । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्र बीड जिल्ह्यात उमटत असून काल गुरुवार रोजी वडवणी शहरातही या घटनेचा निषेध म्हणून वडवणी बंदची हाक देण्यात होती यामध्ये या खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य





सुत्रधाराला तात्काळ अटक करण्यासाठी वडवणी शहरासह तालुक्यात कडकडीत बंद ठेवून घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

बीड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यापासून गुन्हेगारीच्या घटनेमध्ये वाढ होत असून यामध्ये पोलीस प्रशासनाचा वचक राहिलेला नसल्यामुळे दिवसाढवळ्या अपहरण करून खून

पान ३ वर

# सासरवाडीत जावयाच्या खून प्रकरणी सासऱ्यासह चौघांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील सोनक पिंपळगाव येथे पत्नी मुला बाळासह राहत असलेल्या दत्ता विष्णू थोरात याचा सासरे बळीराम किसन गायकवाड यांनी अपघाताचा नाटक करून खून केल्याची घटना घडली पण या प्रकरणाची अंबड पोलिसांनी घटनेचा खरा तपास लावून खून कोणत्या कारणावरून झाला ही घटना उघडकीस आणली. या प्रकरणी आज सासरचे चौघांना अंबड न्यायालयामध्ये हजर केले असता त्या चौघांना सोमवार पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

घनसावंगी तालुक्यातील शिंदे वडगाव येथील मयत दत्ता विष्णू थोरात वय (३४) हा त्याची पत्नी वर्षा दत्ता थोरात ही सासरी नांदत नसल्याने तो पती-पत्नी व मुलाबाळास सासरवाडी सोनक पिंपळगाव येथे सासऱ्याच्या शेतात बऱ्याच महिन्यापासून राहत होता. दत्ता थोरात याचा सोनक पिंपळगाव येथील घटना मध्ये अपघात झाल्याचे सांगून त्याचा मृतदेह अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात त्याचा मेहुणा गौरख गायकवाड यांने तपासणीसाठी आणला. यावेळी मयताच्या अंगावरील मारहाणीच्या जखमा जखमा असल्यामुळे असे डॉक्टरांना दिसून आले यावेळी डॉ. शिदे यांनी त्यास मृत घोषित घटनेची माहिती अंबड पोलिसांना कळविले. घटनेची माहिती मिळतात

अंबड पोलीस हॉस्पिटलमध्ये जाऊन मयत दत्ता थोरात यांच्या नातेवाईकांना कळवून त्यांच्या उपस्थितीत मयताचे शवविच्छेदन करून अंबड पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद केली. त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास करण्यासाठी पोलिस कर्मचरी सुभाष डोईफोडे यांच्याकडे देण्यात आला. दरम्यान मयत दत्ता थोरात याचा भाऊ प्रदीप विष्णू थोरात याने दत्तायी पत्नी वर्षा, सासरे बळीराम किसन गायकवाड, सासू मेहुणा गोरख बळीराम गायकवाड व संदीप बळीराम गायकवाड यांच्याविरुद्ध खून झाल्याचा संशय वरून पोलिसांना लेखी माहिती दिली.त्यानंतर पोलीस निरीक्षक सतीश

पान ३ वर

# संविधानाची तोडफोड करणाऱ्या घटनेच्या मागचा मास्टरमाईंड शोधा -आझाद क्रांती सेना

**माजलगाव । प्रतिनिधी**



परभणी येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये संविधानाची प्रतिकृती ठेवण्यात आलेली आहे.या प्रतिकृतीची तोडफोड करण्यात आली ही तोडफोड हिंदूंचा मोर्चा निघाल्याच्या नंतर काही तासांमध्ये करण्यात आली आहे.ज्या व्यक्तीने या संविधानाची तोडफोड केली आहे त्या व्यक्तीचे ब्रेन वॉश करण्यात आले होते का?याची सखोल चौकशी शासनाने करावी दबक्या आवाजात असे म्हटले जात आहे की काही लोकांनी प्रशोभक भाषणे केल्यामुळेच संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करण्यात आलेली आहे संविधानाचे रक्षण व लोकशाहीचे रक्षण करणाऱ्या समाजाच्या विरोधातच पोलीस प्रशासनाकडून माता माऊल्यांना व दलित तरुणांना मारहाण केली जात आहे,ही गोष्ट निंदनीय आहे जो समाज संविधानाच्या बाजूनी उभा टाकत आहे त्या समाजावर दडपशाही करणे ही बाब लोकशाहीला व संविधानाला घातक ठरणारी आहे म्हणून सरकारने सखोल चौकशी करावी व समाजाचा होत असलेलं कोंबिंग ऑपरेशन थांबून दलित वस्तीतीलपोलिसांचा जमाव काढून घेण्यात यावा व शांतता प्रस्थापित करण्यात यावी तात्काळ या सर्व गोष्टी थांबवा नसता आझाद क्रांती सेनेला रस्त्यावरती उतरावा लागेल याची दखल सरकारने घ्यावी आशा आशियाचे पत्रक आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी प्रसिद्ध दिले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सतीश वाघ यांची पाच लाखांची सुपारी चार महिन्यांपूर्वीपासून आखत होते प्लॅन

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील भाजप नेते आणि विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा आणि हॉटेल व्यावसायिक सतीश सादबा वाघ (वय ५५, रा. मांजरी बुद्रुक) यांचं अपहरण करून निर्घृन खून करण्यात आला. सतीश वाघ करण्यासाठी भाडेकरूनेच पाच लाख रुपयांची सुपारी दिल्याची बाब तपासात समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आत्तापर्यंत चार जणांना अटक केली असून, अन्य एकजण फरार असल्याची माहिती आहे. आरोपींनी सतीश वाघ यांचे कारमधून अपहरण करून चालत्या कारमध्ये धारदार चाकूने गळ्यावर तब्बल ७२ वेळा वार करून त्यांचा खून केला. सकाळी ते व्यायामासाठी बाहेर गेल्यानंतर त्यांचं अपहरण केल्याची माहिती मिळताच वाघ यांचा मुलगा ओंकार वाघ यांनी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सतीश वाघ यांची चार महिन्यांपूर्वी सुपारी

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय जावळकर हा या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आहे. तर, पवन शर्मा याने नवनाथ गुरसाळे आणि



विकास शिंदे या दोघांना सोबत घेऊन सतीश वाघ यांचा खून केला. जावळकर हा पूर्वी वाघ यांच्याकडे भाड्याने राहत होता. वैयक्तिक कारणातून दोघांमध्ये वाद होता. याच कारणातून जावळकरने वाघ यांना संपवण्याचं ठरवलं. शर्मा आणि जावळकर पूर्वी एका ठिकाणी कामाला होते. दोघांची चांगली ओळख होती. जावळकर याने शर्माला वाघ यांचा जीव काढण्यासाठी मागील चार ते पाच महिन्यांपूर्वी पाच लाखांची सुपारी दिली असल्याची माहिती आहे. तेव्हापासून, शर्मा संधीच्या शोधात होता. मात्र, संधी मिळत नव्हती. चार ते पाच दिवसांपूर्वी चौघे परत एकत्र आले. त्यांनी वाघ यांचा काटा काढण्याचं नव्याने प्लॅनिंग केलं. इतकंच नाही तर रेकी करण्यापासून गाडी कशी वापरायची, हे देखील ठरवलं. जावळकर याच्याकडून शर्मा याने सुपारीतील काही पैसे ॲडव्हान्स म्हणून घेतले. रविवारी (दि. ८) रात्री शर्मा, गुरसाळे आणि शिंदे या तिघांनी नियोजन करून अन्य एका चौथ्या साथीदाराला सोबत घेऊन सोमवारी (दि. ९) सकाळी सव्वासहाच्या सुमारास वाघ यांना मार्निंग वॉक करत असताना अपहरण केलं. पुढे चालू गाडीत वाघ यांना चाकूने भोसकून त्यांचा खून केला. मृतदेह शिंदवणे घाटात टाकून चौघांनी पळ काढला होता. या प्रकरणात अन्य कोण सहभागी आहे का तसेच आरोपींनी पैशांची देवाणघेवाण कशी केली, याबाबत पोलिस तपास करत आहेत.

### तब्बल ७२ वेळा चाकूने भोसकसून खून

वाघ यांच्या अपहरणाची माहिती मिळताच गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांच्या पथकांनी आरोपींचा शोध सुरू केला होता. मात्र, सतीश वाघ यांचे अपहरण केल्यानंतर दहा ते पंधरा मिनिटांतच आरोपींनी सतीश वाघ यांचा गाडीतच खून केला असल्याची माहिती समोर आली आहे. वाघ यांना तब्बल ७२ वेळा चाकूने भोसकण्यात आलं. सतीश वाघ यांच्या गळ्यावर सर्वाधिक वार करण्यात आले असून, पाठीवर देखील वार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. वाघ यांचा जीव गेल्यानंतर आरोपींनी मृतदेह शिंदवणे घाटातील निर्जनस्थळी फेकून दिला. सायंकाळी त्यांचा मृतदेह स्थानिक नागरिकांना आढळला. त्यांनी याबाबत उरुळी कांचन पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहचून तपास केला.

# ....म्हणून विठ्ठलाचे महत्त्व कमी होत नाही' शरद पवारांच्या वाढदिवसानिमित्त बारामतीत लागले बॅनर




बारामती । प्रतिनिधी

ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांचा गुरुवारी (दि. १२) वाढदिवस साजरा झाला. यानिमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार, खा. सुनेत्रा पवार यांच्यासह कुटुंबियांनी दिल्लीत खा. पवार यांना शुभेच्छा दिल्या. परंतु बारामतीत मात्र एका बॅनरद्वारे अजित पवार यांना चिमटा काढण्यात आला. या बॅनरची जोरदार चर्चा बारामतीत रंगली. 'मंदिराच्या चाव्या पुजाराच्या हातात गेल्या, म्हणून विठ्ठलाचे महत्व कमी होत नाही' अशा आशयाचा हा फलक बारामतीत मुख्य ठिकाणीच लावण्यात आला आहे.

खा. शरद पवार यांच्या वाढदिनी उपमुख्यमंत्री पवार, खा. सुनेत्रा पवार, पार्थ पवार, आमदार रोहित पवार, युगेंद्र पवार आदींनी दिल्लीत त्यांना शुभेच्छा दिल्या. परंतु या भेटीपेक्षा बारामतीत पंचायत समितीसमोर साहेबप्रेमी बारामतीकराने लावलेल्या बॅनरचीच अधिक चर्चा झाली. खा. शरद पवार यांचा वाढदिवस म्हणजे बारामतीत भरगच्च कार्यक्रम अशी स्थिती यापूर्वी होती. सांस्कृतिक, मनोरंजन, नाट्य, क्रीडा, कला, सहकार आदी सर्व क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाचे आयोजन केले जात होते. बदललेल्या राजकीय स्थितीत लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांना यश आले. परंतु विधानसभेला अजित पवार यांनी त्याची परतफेड केली. त्यामुळे यंदा वाढदिवस कार्यक्रमावर मर्यादा आल्या. पक्ष व कुटुंबातील फूटीनंतर पवार कुटुंबियांनी गुरुवारी दिल्लीत शरद पवार यांना शुभेच्छा दिल्या असल्या तरी बारामतीत मात्र वाढदिनी शांतताच होती. ज्या सहकारी संस्थांच्या उभारणीत शरद पवार यांनी मोलाचे योगदान दिले, त्यांनीही बदलत्या राजकीय स्थितीत वाढदिनी कार्यक्रम घेतले नाहीत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून काही समाजपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले.

# ट्रक व बल्करचा भीषण अपघात



पुणे । प्रतिनिधी

पुणे-सोलापूर महामार्गावरील अपघातांचा सिलसिला सुरूच असून, प्रयागधाम फाट्यावर टेम्पो व सिमेंट बल्करच्या झालेल्या जोरदार अपघातात टेम्पोचालक व बल्करचालक अशा दोघांचाही जागीच मृत्यू झाला आहे. बुधवारी (दि. ११) पहाटे १ वाजेच्या सुमारास हा भीषण अपघात घडला.

अदनाम यामुदआली हुसेन (वय २७, रा. बेल्कर, जि. धर्मपुरी, रा. उत्तर प्रदेश) आणि पार्थ रत्नसिंग शितोळे (वय २०, रा. पडवी, ता. दौंड) असे अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोलापूरकडून पुण्याकडे ट्रक (एम एच १२ क्यूजी ७२२२) निघाला होता. ट्रकचालकाचा गाडीवरील ताबा सुटला व हा ट्रक दुभाजक तोडून सोलापूरकडे निघालेल्या बल्करवर (एमएच ०१ पीआर ६८५१) जाऊन आदळल्यामुळे हा अपघात घडला. या अपघातात ट्रक व बल्करचा दर्शनी भागाचा चक्काचूर झाला असून, दोघे चालक वाहनात सापडून ठार झाले. अपघात झाल्यानंतर घटनास्थळी मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या वेळी नागरिक व उरुळी कांचन पोलिसांच्या मदतीने दोन्ही चालकांना गाडीतून बाहेर काढले. मात्र, उपचारापूर्वीच या दोघांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, या अपघाताने पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक वाहतुकीचे भय अद्याप संपले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

# बंधाऱ्याच्या ढाप्यांमधून गळती

शिरूर । प्रतिनिधी

मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील कोल्हापुरी बंधार्याला गळती सुरू झाली आहे. ही गळती त्वरित न थांबवल्यास उन्हाळ्यामध्ये पिकांना तसेच सिंचनासाठी पाण्याचे दुर्भिक्ष होणार आहे. संबंधित विभागाने गळती रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक शेतकर्यांनी केली आहे.

मांडवगण फराटा येथील भीमा नदीपात्रात बंधारा आहे. बंधार्यावर दरवर्षीप्रमाणे पावसाळा संपल्यानंतर ढापे टाकण्याचे कामकाज सुरू आहे. बर्यापैकी ढापे टाकून देखील झाले आहेत, परंतु मध्यभागी जे ढापे टाकले आहेत, त्या ढाप्यांमधून सध्या पाण्याची मोठी



गळती होऊ लागली आहे. पाण्याची गळती अशीच सुरू राहिली तर लवकरच बंधारा कोरडा होऊ शकतो. परिणामी, गरजेच्या वेळी पाण्याचा तुटवडा निर्माण होऊन पिके जळू शकतात. त्यामुळे संबंधित ठेकेदाराने त्वरित ढापे बदलून पाण्याची गळती थांबवावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. दरवर्षी बंधार्यातून पाण्याची गळती होते. यंदा जूनपर्यंत पाण्याच्या उपलब्ध साठ्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. दोन वर्षे शेतकरी अडचणीत होते, त्यात कसेबसे पीक जगविले. या भागात पशुधन मोठ्या प्रमाणावर आहे. जनावरांना पाणी व चारा टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी बंधार्यातील गळतीकडे अधिकार्यांनीही लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

# मासेमारीसाठी कीटकनाशकाचा वापर नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

पुणे । प्रतिनिधी

मागील काही वर्षांत देशवासीयांचा मांसाहाराकडे वाढता कल दिसत असून, त्यातही माशांना अधिक पसंती मिळत आहे. दुसरीकडे मासेमारीसाठी काळानुरूप तंत्रज्ञानाचा वापर वाढला. त्यामध्ये तीव्रतेने व्यावसायिकता देखील आली. परंतु, आता डोळ्यांना एकदम छान व ताजे दिसणारे मासे खाणे हे धोकादायक बनले आहे. सध्या मासेमारीसाठी मोठ्या प्रमाणात 'लॅम्बड सायहॅलोथ्रीन' अर्थात 'कराटे' नावाचे घातक कीटकनाशक वापरले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पुणे जिल्ह्यात धरणे तसेच नदीच्या मासेमारीसाठी या कीटकनाशकाचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या कीटकनाशकाच्या विक्रीवर बंदी असतानादेखील अधिकचे पैसे घेत विक्री केली जात आहे.

शासनाच्या आदेशानुसार काही महिन्यांपूर्वी कृषी विभागाच्या वतीने कांदा पिकासाठी 'लॅम्बड सायहॅलोथ्रीन' कीटकनाशकाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला किंवा कसे, यासंदर्भात सर्वेक्षण करण्यात आले. परंतु, कांदा पिकांसाठी नाही, तर मासेमारीसाठी या कीटकनाशकाचा वापर अधिक होत असल्याचे निदर्शनास आले. विविध कंपन्यांचे हे कीटकनाशक सध्या बाजारामध्ये सहज उपलब्ध होत असून, २५० एमएलची बाटली १८५ रुपयांना मिळते. त्यामध्ये कराटे नावाने असलेले हे कीटकनाशक जास्त वापरले जात आहे. हेच मासे खाण्यात आल्यास नागरिकांच्या आरोग्यास नव्हे, तर जीवितासही धोका होऊ शकतो. जिल्ह्यातच नाही तर सर्वत्रच या कराटे कीटकनाशकाचा मासेमारीसाठी वापर होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

# पाच लाखांपर्यंतच्या ठेवी मिळण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करा ;रुपी बॅंकेकडून आवाहन

पुणे । प्रतिनिधी

अवसायनात असलेल्या येथील रुपी को-ऑप. बॅंकेच्या ज्या ठेवीदारांनी पाच लाखांपर्यंतच्या ठेवींची रक्कम परत मिळण्यासाठी बॅंकेकडे अर्ज केले नाहीत, अशा ठेवीदारांनी आपल्या नजीकच्या बॅंक शाखा अथवा मार्केट यार्डातील मुख्य कचेरीकडे संपर्क साधून ठेवी परत मिळण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज दाखल करण्याचे आवाहन बॅंकेचे अवसायक मधुकांत गरड यांनी केले आहे.




रुपी को-ऑपरेटिव्ह बॅंक ही ३१ ऑक्टोबर २०२२ पासून अवसायनात घेण्यात आली. रुपीच्या ज्या ठेवीदारांनी आपल्या ठेवी परत मिळण्यासाठी बॅंकेकडे अर्ज दाखल केले होते, अशा ठेवीदारांना ठेव विमा महामंडळामार्फत (डीआयसीजीसी) पाच लाख रुपयांपर्यंतची विमा संरक्षित रक्कम देण्यात आली आहे. तसेच, ज्या ठेवीदारांना शाखेमध्ये अर्ज देणे शक्य नसेल, अशा ठेवीदारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून कागदपत्रे समक्ष येऊन द्यावीत अथवा रजिस्टर पोस्टाद्वारे बॅंकेच्या मुख्य कचेरी येथे ३१ डिसेंबरपूर्वी पाठवून बॅंकेस सहकार्य करावे. त्यामध्ये केवायसी, ठेव पावती, पासबुक व ज्या बॅंकेमध्ये रक्कम जमा करावयाची आहे, त्या बॅंकेचा रद्द केलेला चेक अथवा सदर खात्याचे पासबुक इत्यादींचा समावेश आहे. तसेच, विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म बॅंकेच्या्ु. ींिशिशलरपज्ञ.लो या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ठेवीदारांनी क्लेम फॉर्म डाऊनलोड करून नमूद केलेल्या कागदपत्रांसह दोन प्रतींमध्ये पूर्तता करून मुख्य कचेरी येथे पोस्टाद्वारे पाठविण्याचे अथवा समक्ष येऊन देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच, या संदर्भात बॅंकेच्या संकेतस्थळावरही आवाहन प्रसिद्धीस देण्यात आलेले आहे.

डोईफोडे यांच्या राजीनाम्यामुळे गरड यांची नियुक्ती

रुपी बॅंकेचे यापूर्वीचे अवसायक व सेवानिवृत्त प्रादेशिक साखर सहसंचालक धनंजय डोईफोडे यांनी बॅंकेच्या अवसायक पदाचा राजीनामा देऊन या पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती सहकार आयुक्तालयास २५ सप्टेंबर २०२४ रोजी केली होती. त्यानंतर सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी २९ नोव्हेंबर रोजी डोईफोडे यांच्या ऐवजी सेवानिवृत्त सहकार उपनिबंधक मधुकांत विनायक गरड यांची अवसायक म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत. रुपी बॅंकेवर गरड यांनी यापूर्वी काम केलेले आहे. त्या अनुभवाचा फायदा अवसायन कामकाजाचे समाप्तीकरण करण्यासाठी होण्याची अपेक्षा आहे.

# पुण्यात गॅस शेगडीवरील लायटरचा स्फोट, पोलीस कर्मचारी गंभीर जखमी

पुणे : धूम्रपान करण्यासाठी विशेषतः सिगारेट ओढण्यासाठी सध्या लायटर्सचा सर्रास वापर केला जातो. पुण्यासारख्या शहरात हा वापर सहजतेने केला जातो. त्यामुळेच पान टपरी असो किंवा चहा-



नाश्त्याचा गाडा लायटरचा (डळसहींशी) वापर अनेकदा गॅस पेटवण्यासाठी देखील केला जातो. मात्र, हाच प्रकार अंगलट आल्याने एका चहा स्टॉलवालवर स्फोट झाल्याची दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एक पोलीस कर्मचाऱ्यास गंभीर दुखापत झाली असून पुण्यातील (झींपश) शिवाजी नगर परिसरात हा अपघात घडला.

पुण्यातील शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट क्रमांक तीन समोरील एका चहा स्टॉलवर गॅस शेगडीजवळ ठेवलेल्या लायटरचा स्फोट झाल्याने एकच खळबळ उडाली. येथील गॅस शेगडीवर ठेवलेला लायटर गरम होऊन त्याचा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना आज दुपारी सव्वादोनच्या सुमारास घडली. येथील वडापावच्या गाडीवर दुपारी कर्मचारी जेवायला आले असता ही घटना घडली. त्यावेळी, झालेल्या आगीच्या भडक्यात पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील एक पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. त्यांच्या हाताला आणि चेहऱ्याला भाजल्याची माहिती आहे. पोलीस निलेश सुभाष दरेकर असे जखमी झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. तर, पोलिसांकडून अधिक तपास केला जात आहे. दरम्यान, औंधच्या जिल्हा रुग्णालयात जखमी पोलीस कर्मचाऱ्यावर उपचार सुरू आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे, मात्र हाताला व चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली आहे.

# भिगवण ग्रामपंचायतीसाठी ४० लाखांचा निधी मंजूर

भिगवण । प्रतिनिधी

भिगवण ग्रामपंचायतीस अंतर्गत रस्त्याच्या कामासाठी जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत चाळीस लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती सरपंच दीपिका क्षीरसागर यांनी दिली आहे

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे या अंतर्गत सदरची कामे मंजूर झाली आहेत. यामध्ये साईनगर परिसर रस्ता प्रभाग क्रमांक-२ १० लक्ष रुपये, शिवाजीनगर परिसर १० लाख, रो हाऊस परिसर प्रभाग क्रमांक-४ साठी १० आणि स्वामी विवेकानंद नगर प्रभाग क्रमांक-४साठी १० लाख रुपये याप्रमाणे एकूण ४० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदर निधीमधून गावामधील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे. यामुळे भिगवण गावातील अंतर्गत रस्त्याचा प्रश्न बऱ्यापैकी सुटणार असल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. याबाबत बोलताना सरपंच क्षीरसागर म्हणाल्या, मागील दोन वर्षाच्या काळात अंतर्गत रस्त्याच्या कामाला प्राधान्य दिले होते. अंतर्गत रस्त्यासाठी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्यामुळे गावातील अंतर्गत रस्त्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

# नोकरीसाठी बनावट पोलिस सर्टिफिकेट ; दहशतवादविरोधी पथकाने केले रॅकेट उघड

पुणे । प्रतिनिधी

सर्टिफिकेट विक्री करणारे रॅकेट पोलिसांनी उद्ध्वस्त केले आहे. या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या एजंटला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवादविरोधी पथकाने दिघी पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कंपन्यांमध्ये चालक, सुरक्षारक्षक, हाऊसकिपिंग अशा प्रकारचे काम करण्यासाठी संबंधित अर्जदाराचे पोलिस व्हेरिफिकेशन बंधनकारक करण्यात आले आहे. पोलिस व्हेरिफिकेशन सर्टिफिकेट मिळवण्यासाठी संबंधित उमेदवाराचे आधारकार्ड, रेशनकार्ड, सध्या राहत असलेला पत्ता, याबाबतचे पुरावे द्यावे लागतात; तसेच त्याच्यावर यापूर्वी गुन्हा दाखल आहे का, याची माहिती घेतली जाते. दरम्यान, अनेक कंपन्यांनी आपल्याकडे नोकरीला येणार्या नोकरदारांचे पोलिस व्हेरिफिकेशन करण्यासाठी एजंटची नेमणूक केली आहे. पोलिस व्हेरिफिकेशन झाल्यावर या एजंटना त्याचे पैसे दिले जातात; मात्र अनेक नागरिकांकडे राहण्याचा पत्ता किंवा त्या संबंधिचे पुरावे नसतात. त्यामुळे एजंट राहण्याचा खोटा पत्ता व पुरावा तयार करतात. अशा प्रकारची आणखी काही कागदपत्रे तयार करून ती पोलिस ठाण्यात सादर करतात. खोट्या कागदपत्रांच्या आधारे पोलिस व्हेरिफिकेशन करून घेतात. काही नोकरदारांकडून जादा पैसे घेऊन थेट पोलिस ठाण्याच्या नावाने बनावट पोलिस क्लीअरन्स सर्टिफिकेट दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दिघी येथील टाटा कम्युनिकेशन कंपनीतील कामगारांची खोटी कागदपत्रे बनवून त्याद्वारे पोलिस क्लीअरन्स सर्टिफिकेट देण्याचे काम काहीजण करत असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यानुसार, दहशतवादविरोधी पथकाने मंगळवारी (दि. १०) कारवाई करत तीन आरोपी आणि त्यांना मदत करणार्या लोकांवर दिघी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. संदीप बनसोडे (रा. लोहगाव व येरवडा), सुनील रोकडे (रा. पिंपळे गुरव), एक मोबाईलधारक व्यक्ती आणि त्यांना मदत करणारे (नाव व पत्ता माहिती नाही) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सन २०२१ पासून रॅकेट चालवत असल्याचे तपासात समोर आल्याने पोलिसही चक्रावले आहेत.

### कामगार तपासणीत झाला भांडाफोड

दहशतवादविरोधी पथकाकडून शहरातील मोठ्या कंपन्यांतील कामगारांची तपासणी केली जाते. दरम्यान, टाटा कम्युनिकेशन कंपनीत तपासणी करण्यासाठी पथकातील पोलिस गेले असता त्यांना कामगारांच्या पोलिस क्लीअरन्स सर्टिफिकेटबाबत संशय आला. या सर्टिफिकेटची पडताळणी केल्यानंतर ती खोट्या कागदपत्रांच्या आधारे बनविल्याचे समोर आले. तसेच, काही बनावट सर्टिफिकेट असल्याचेही समोर आले. ज्यामुळे रॅकेटचा भांडाफोड झाला.

# वेश्याव्यवसायातील महिलांसाठी 'मार्ग हक्काचा, सन्मानाचा' कार्यक्रम

पुणे – बुधवार पेठेत मागील १९ वर्षांपासून वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी आणि त्यांच्या मुलांसाठी कार्यरत असलेल्या रेव्ह. हरीभाऊ वाघमोडे पाटील प्रतिष्ठानतर्फे जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून 'मार्ग हक्काचा, सन्मानाचा' या विशेष थीमवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान, प्रतिष्ठानच्या प्रतिनिधी सारिका लष्करे यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, समाजाच्या दुर्लक्षित घटकांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक त्या सुविधा आणि पाठिंबा देणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांद्वारे या घटकांना नवा आत्मविश्वास आणि समाजाचा स्वीकार मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

तर आपल्या कृतीतून आणि विचारांतून समानता आणि आदर यांची शिकवण रुजवूया. एकत्रितपणे कार्य करून आपण एचआयव्ही/एड्समुक्त आणि सन्मानाने जगणाऱ्या समाजाची उभारणी करू शकतो, असे मत ड. श्रीकांत ठाकूर यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी




करण्यासाठी संस्थेने आपल्या समर्थकांचे आणि सहभागींचे मनःपूर्वक आभार मानले, ज्यामध्ये संवाद फाउंडेशन, अलका ताई, सीमा ताई, आरतीताई, अमोल कांबळे, आकाश ससाणे, सागर भाऊ, चेतन भाऊ, तसेच सहायक पोलीस निरीक्षक प्रतीक्षा शेडगे यांचा विशेष उल्लेख करण्यात आला